मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मुगवाणी ✓
१२३९

[illegible]

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

वर्ष २३ अंक : नववा

जानेवारी १९६९

अनुक्रमणिका

मराठी

साहित्य संमेलन

४८ वे अधिवेशन

वर्धा

संमेलनीय

कार्य–रेखन

स्थळ :

स्वावलंबी विद्यालय

वर्धा

शनिवार, दि. ४ जानेवारी ६९

दुपारी ३ वाजता : **प्रदर्शन उद्‌घाटन**

सायं. ४ वाजता : **सम्मेलन-प्रारंभ, श्रीशारदा पूजन**

प्रास्ताविक : डॉ. द. वा. पोतदार

उद्‌घाटन : मा. मधुकरराव चौधरी शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य

संदेश वाचन :

स्वागताध्यक्ष भाषण : श्री. रामेश्वर वजाज

अध्यक्ष–पद सूचना : श्री. ग. त्र्यं. माडखोलकर

अधिकार प्रदान : पूर्वाध्यक्ष; डॉ. वि. भि. कोलते

अध्यक्षांचे स्वागत :

अध्यक्षीय भाषण : श्री. पु. शि. रेगे

पसायदान :

वन्देमातरम् :

रात्री ९ वाजता : **नृत्य– समारोह*** : मंदाकिनी मालवीय : कथ्थक, कु. अलका : वेन्द्रे, कु. प्रीतिमा सोमण, कु. कानन : कुळकर्णी,
गायन : कु. मीता महोदय

रविवार, दि. ५ जानेवारी ६९

सकाळी ९ ते ११ : **परिसंवाद** : **मराठीचे अध्यापन**
अध्यक्ष : डॉ. ना. गों. कालेलकर

दुपारी १ ते ४ : **लेखिका सम्मेलन**

१ ते ६ : **परिसंवाद** : **माझ्या मते उत्कृष्ट कवितेचे गमक**
अध्यक्ष : श्री. आ रा. देशपांडे (कवी अनिल

सायं. ६ ते ७ : **सत्कार व परिचय** : नगर परिषदेद्वारा.

रात्री ९ वाजता : **नाट्यकृती *** : प्रा. मो. दा. देशमुख लिखित
'नयनांत आसवे हसली'
कलावंत : साहित्य साधना वर्धा

सोमवार, दि. ६. जानेवारी ६९

सकाळी ९ ते ११ : **परिसंवाद** : **'ऐतिहासिक कादंबरीचे निकष'**
अध्यक्ष : डॉ. द. वा पोतदार

दुपारी १ ते ४ : **सहल** : (सेवाग्राम व परमधाम)

सायंकाळी ४ ते ७ : **खुले अधिवेशन समारोप आभार**

रात्री ९ वाजता : **सुश्राव्य संगीत*** : सौ. निर्मला गोगटे, एम्. अे.

---

*रात्रीच्या सर्व कार्यक्रमांना शुल्क अनिवार्य आहे. कार्यक्रमांच्या तिकिटा कार्यक्रम स्थानावर विकत मिळतील, ही नम्र सूचना.

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २३) जानेवारी १९६९ (अंक ९

संपादक
प्र. वा. ऊर्ध्वरेषे

संपादक मंडळ
डॉ. मा. गो. देशमुख
प्राचार्य भाऊ मांडवकर
डॉ. द. भि. कुळकर्णी

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
व्हीनस प्रिंटिंग हौस
धंतोली, नागपूर-१

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

४८ वे साहित्य संमेलन

व

संमेलनाध्यक्ष पु. शि. रेगे

मराठी साहित्य संमेलनाचे अठ्ठेचाळीसावे अधिवेशन वर्धा येथे प्रतिष्ठित मराठी साहित्यिक प्राचार्य पुरुषोत्तम शिवराम रेगे यांच्या अध्यक्षतेखाली दि. ४–५–६ जाने. १९६९ रोजी म्हणजे चालू महिन्याच्या प्रारंभी साजरे होत आहे. आम्ही या अधिवेशनास सदिच्छा व्यक्त करून श्री. पु. शि रेगे यांचे मनापासून अभिनंदन करतो. १९३१ पासून श्री. रेगे लेखन करीत आहेत. साधना (१९३१), फुलोरा (१९३७), हिमसेक (१९४३), दोला (१९५०/१९६२), गंधरेखा (१९५३), पुष्कळा (१९६०), दुसरा पक्षी (१९६६) [आणि 'केतकी' ?] हे त्यांचे काव्यग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. म्हणजे कुसुमाग्रज-बोरकर अनिल या पिढी-बरोबर रेगे यांनी काव्यलेखन सुरू केले आहे आणि आमटे-सुर्वे यांच्या या काळातही ते त्याच जोमाने सुरू आहे. रेगे यांच्या या कवितेला गाडगीळ-आचवल-चित्रे असे मान्यवर समीक्षक लाभले आहेत परंतु तिची पृथगात्मकता व सूक्ष्मता अशी की तिच्या मर्मबंधातील ठेव अजूनही आपणास दूरस्थच आहे असे रसिकांस वाटत राहते— हे अस्सल कलाकृतीचे एक लक्षण होय. नंतरच्या काळात, पण काव्यलेखन सुरू असतानाच, रेगे कथेकडे वळले. (रूपकथ्यक–१९५६ /मनवा १९६८) रेग्यांना 'कथा' हा शब्द रुचत नाही, ते आठवणीने 'गोष्ट' हा शब्द वापरतात. त्यांच्या या गोष्टी प्रथम 'छंद' मधून अव-तरल्या. 'छंद'प्रमाणेच त्यांचा बांधा अटकर आणि वृत्ती लाजाळूच्या रोपाची. एकेकदा तर असे वाटू लागते की त्यांच्या काव्यापेक्षा या

सं पा

कथा'च अधिक काव्यात्म आहेत. रेग्यांच्या या गोष्टींची, साहित्य अकादमीच्या 'मराठी लघुकथा-संग्रहा'ने दखल घेतली नसली तरी साहित्य अकादमीच्याच 'समकालीन भारतीय लघुकथा' या इंग्रजी लघुकथासंग्रहात मराठी कथेचे प्रतिनिधित्व करण्याचे भाग्य त्यांच्या 'मनू'ला लाभले आहे. कालयवन, माधवी : एक देणे, रंगपांचालिक ही त्यांची काव्यात्म नाटकेही (रंगपांचालिक आणि दोन नाटके–१९५८) 'छंद'मधून प्रकाशित झाली.

द की य

मराठी रंगायनाने रंगपांचालिकाचे हे आव्हान मात्र अजून स्वीकारलेले नाही. 'छंद'मधील संपादकीय स्फुटाच्या व अन्य निमित्ताने रेगे यांची समीक्षा साकार झाली. या समीक्षेवरून व रेगे यांच्या एकूण साहित्य-निर्मितीवरून ते सौंदर्यवादी, कलावादी विचारवंत आहेत असे दिसते; मर्ढेकरांच्या नंतर सौंदर्यवादाची ध्वजा रेगेच सांभाळीत आहेत इथेच रेग्यांच्या संपादकीय कर्तृत्वाचा निर्देशही उचित ठरेल. १९५४ ते ६० ही सहाएक वर्षे रेग्यांनी 'छंद' या द्वैमासिकाचे आतून संपादन केले. ४३ ते ५३ हे दशक नवसाहित्याने गाजविले होते; आणि आता आघाडीचे वीर जरा विसावा घेत होते; 'अभिरूचि' बंद पडले होते आणि 'सत्यकथे'-कडे नवानुकरणी साहित्याचे खलिते जात होते. असा नवतेचाच आवर्त होणार अशा वेळेस 'छंदने' आपले आपले वाङ्मयीन कार्य सुरू केले, व उत्तम रीतीने पार पाडले. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, प्राचार्य मे. पु. रेगे हे विचारवंत, केचे, ग्रेस, अंबादास माडगूळकर, रा. ग. जाधव हे कवी इत्यादी साहित्यिक हे खास 'छंद'चे 'शोध' आहेत असे म्हटल्यास फारशी अतिशयोक्ती होणार नाही असे वाटते. या ताज्या दमाच्या साहित्यिकांप्रमाणेच 'छंद'ने के. नारायण काळे, प्रा. वा. ल. कुळकर्णी, डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये, ज्ञानेश्वर नाडकर्णी, प्रा. अरविंद मंगरूळकर, द. ग. गोडसे यांचेही सहकार्य मिळविले होते. त्यामुळे सहा वर्षात 'छंद'ने चिकित्सक वाचकास आपला लळा लावला होता; म्हणूनच आजही तप अर्ध्यावरच टाकून जाणाऱ्या छंदबद्दल वाईट वाटत राहते. अगदी अलिकडे रेग्यांनी दोन कादंबऱ्या लिहिल्या : सावित्री (१९६२) आणि अवलोकिता (१९६४). 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराचा फेरविचार करावयास लावण्याचे सामर्थ्य या दोन कृती-मध्ये खचित आहे. प्रा. गो. म. कुळकर्णी यांच्या बरोबरीनेच या कादंबरीद्वयाची इतर समीक्षकांनी समीक्षा करावयाची आहे. 'सावित्री'चे इंग्रजी, हिंदी, बंगाली आणि डॅनिश भाषांमध्ये भाषांतर झालेले आहे, हेही येथे नमूद करणें औचित्यपूर्ण ठरावे.

रेगे यांच्या या सर्व ललित गद्यपद्य साहित्याचा एक समान विशेष म्हणजे त्यातील शब्दातीत काव्यात्मता आणि जीवनवंत वृत्ती. रेगे यांच्या स्वभावात, व्यक्तित्वातही हे विशेष सहजासहजी जाणवतात. आपले वय आपली सुस्थिती, आपली सत्ता, आपली अर्थशास्त्रीय विद्वत्ता, आपली वाङ्मयीन प्रतिष्ठा, एवढेच नव्हे तर आपली काळी अवघड काया हे सारे सहज विसरून रेगे जीवनात वावरतांना, इतरांशी वागताना दिसतात. वाङ्मयीन किंवा वाङ्मयेतर अशी आपली कुठलीही कमाई आणि बरोबरी नसताना जेव्हा रेगे आपले सहज-मिस्कील वाटणारे पण नसणारे-हसू आपल्यावर उधळतात, आपल्या निरपेक्ष स्नेहाची आतून आणि वरून उधळण करतात तेव्हा आपण मुंबापुरीत नसून खऱ्याखुऱ्या माणूसपुरीत आहोत याचा प्रत्यय आपल्याला येतो; आपण आपल्याच भावाने ओशाळून जातो.

अशा या मनमोकळ्या थोर कलावंताचे पुन्हा एकदा अभिनंदन.

पु. शि. रेगे यांची शद्बसृष्टी

डॉ. द. भि. फुळकर्णी

पु शि. रेगे हा मराठीतील एक अपवादात्मक साहित्यिक आहे. त्याचे हे अपवादात्मक स्वरूप अनेक अर्थांने खरे आहे: संस्कृत साहित्य, प्राकृत साहित्य, संत साहित्य, शाहिरी साहित्य, अद्ययावत पाश्चात्य साहित्य इत्यादी विविध आणि विरोधी साहित्यपरंपरांच्या जन्मखुणा त्यांच्या वाङमयकलेवर आढळतात; आणि तरीही कुठल्याही परंपरेत त्याचे साहित्य बसताना दिसत नाही; त्यांच्या कविता, कादंबऱ्या, नाटके आणि कथा मराठी नववाङमयप्रवाहात मानाचे स्थान मिळवितात; आणि तरीही समकालीन सांस्कृतिक आणि वाङमयीन जीवनापासून त्यांचे वाङमय निर्वृत असते. त्याच्या अशा अपवादात्मक, अनन्य स्वरूपामुळेच बहुधा या निर्मितीची समीक्षा करणे अवघड होऊन बसते.

खरे तर वाङमयरूपाच्या शुद्ध स्वरूपाच्या इतके जवळ रेगे यांचे साहित्य जाते की त्याचा आस्वाद आणि त्याची सभीक्षा हे सर्वात सोपे काम ठरावे. परंतु वाङमयकलेच्या संदर्भात कलाबाह्य अंगाने बोलण्याच्या सवयीमुळे जे साधेसोपे उघड तेच अडचणीचे, आडवळणाचे वाटू लागते.

रेगे यांच्या ललित गद्याचे–आणि काव्याचेही-नीट आकलन आणि मूल्यमापन व्हायचे असेल तर एक लक्षात ठेवले पाहिजे की त्यांच्या दृष्टीने साहित्यनिर्मिती हा त्यांचा स्वतःच्या व्यक्तित्वाचा अविष्कार नसून ती भाषिक पातळीवरील एक वस्तुनिष्ठ सौंदर्यात्म संघटना आहे– वास्तविक वाङमयकृती अशीच असावयास हवी– पण रेगे यांच्याबाबतीत हे पूर्णांशाने, जाणिवेने आणि निखळ स्वरूपात खरे आहे. म्हणूनच त्यांचे साहित्य वाचत असताना आपण एका व्यक्तिमनाच्या सहवासात आहोत असे आपणास वाटत नाही–त्यांच्या मधल्या काळातील काही कविताच याला अपवाद असतील - तर भाषिक पातळीवर एक घाटदार भावानुभूतीच आपण अनुभवीत असतो. तसे पाहिले तर यात विशेष काय आहे ? प्राचीन अभिजातवादी साहित्य हे असेच त्या त्या कलावंताच्या व्यक्तित्वाचा अविष्कार नसलेले, या अर्थांने वस्तुनिष्ठच नाही का ? किंवा अर्वाचीन कथा–कादंबऱ्या तरी कुठे त्या त्या कलावंताच्या व्यक्तित्वाचा अविष्कार करीत असतात? त्यातही अशीच एक वस्तुनिष्ठ निर्मितीच नसते का ? हे प्रश्न बरोबर आहेत. पण त्याबरोबर हेही खरे आहे की आजचे अधिकांश काव्य म्हणजे त्या त्या कवीच्या व्यक्तित्वाचा अविष्कार आहे– निदान व्यक्तित्वाचा आविष्कार ही त्यांची निर्मितीप्रेरणा आहे; आणि हे ही खरे आहे की प्राचीन अभिजातवादी साहित्यकृतींना व अर्वाचीन कथा–कादंबऱ्यांना जे कलावंत व्यक्तित्वनिरपेक्ष वस्तुनिष्ठ अस्तित्व लाभते ते मुख्यतः कथाबंधाच्या, कलासंदर्भाच्या पातळीवर, सौंदर्यात्म संघटनेच्या पातळीवर नव्हे. म्हणूनच रेगे यांच्या कलाकृतींचे वस्तुनिष्ठअस्तित्वस्वरूप व प्राचीन व समकालीन अधिकांश कलाकृतींचे वस्तुनिष्ठ अस्तित्वस्वरूप यांत प्रकारनिष्ठ भेद पडतो. या बाबतीत रेगे यांच्याशी बरोबरी करणारा आणि काव्याच्या क्षेत्रात तर त्यांनाही स्तिमित करणारा अर्वाचीन कवी एकच–मर्ढेकर.

रेगे यांनी काव्याच्या क्षेत्रात आत्माविष्काराच्या जागी 'शब्दांची सौंदर्यात्म वस्तुनिष्ठ संघटना साधणे' ही प्रेरणा बाळगली व त्यासाठी त्यांच्या कवितेला अपरिहार्यपणे, सहजच अव्यक्तिगत रूप, संस्कृत, प्राकृत, पाश्चात्य इत्यादी विविध परंपरांचे बळ, लौकिकातील अविष्कारातुरतेमुळे येणारी उत्कटता जाऊन तिच्या जागी एकेकाला शब्दार्थाने एकमेकांत मिसळून संपूर्ण कविताच एक शब्द होणे असे स्वरूप आले. वेगळ्या शब्दात सांगायचे तर रेगे यांची कविता जीवशास्त्रीय प्रेरणेतून निर्माण होत नाही, ती लौकिकभिन्न अशा त्यांच्या सौंदर्यभावनेतून निर्माण होते. ती रेग्यांच्या लौकिक व्यक्तित्वाचा किंवा या लौकिकभिन्न सौंदर्यदृष्टीचाही अविष्कार नसते तर त्यांच्या शब्दांतून व्यक्त होणाऱ्या लौकिक, जीवशास्त्रीय भावानुभूतीची लयबद्ध संघटना या सौंदर्य दृष्टीने साधणारी अशी ती एक प्रत्यक्ष वस्तू, अस्तित्वच असते.

ललित गद्याच्या क्षेत्रात 'लौकिक पातळीवरील आत्मविष्कार कसा टाळावा' ही कलात्मक समस्या रेगे यांच्यापुढे नव्हतीच - त्यांनी जर आत्मचरित्र, लघुनिबंध हे प्रकार हाताळले असते तर या समस्येला गद्याच्या क्षेत्रातही त्यांना तोंड द्यावे लागले असते. इथे त्यांच्या समोर कलात्मक समस्या होती ती गद्य साहित्यकृतीला कथाबंधात्मक कालसंदर्भ न देता वस्तुनिष्ठ करण्याची--कारण या क्षेत्रात परंपरा होती ती कथा-कादंबरीला वस्तुनिष्ठ, आत्मविष्कार-रहित रूप द्यावयाचे ते कथाबंधात्मक कालसंदर्भ देऊन. तंत्रनिष्ठ भाषेत सांगायचे म्हणजे आजवर कथा-कादंबरीला आत्मविष्काररहित रूप मिळत गेले ते त्यांत पात्र-प्रसंग, व्यक्तिदर्शन-कथानक या घटकांना आशयाचे संघटनातत्त्व म्हणून स्थान मिळाल्याने. अमूक घटना आधी घडली, अमूक घटना नंतर घडली मग त्यांचा निवेदनक्रम कोणताही असो--किंवा अमूक पात्राचा स्वभाव आधी असा होता नंतर असा झाला अथवा त्याच्या स्वभावाला क्रमाने असे पैलू होते असे चित्रित करणे हेच कथा-कादबरीतील व्यक्तिदर्शन, यालाच म्हणावयाचे कालतत्त्व. रेगे यांच्याही कथा-कादंबऱ्यांत पात्रे आणि प्रसंग आहेतच, आणि पात्र-प्रसंग आहेत म्हटल्यावर त्यात कालानुक्रम हाही असणारच. पण तरीही त्यांच्या कादंबऱ्यांतील भावानुभूतीचे संघटनातत्त्व हे कालतत्त्व नाही. म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्यांत पात्र आणि प्रसंग असूनही व्यक्तिदर्शन आणि कथाबंध-रूढ भाषेत कथानक-हे घटक नाहीत. व्यक्तिदर्शनरहित व कथाबंधरहित ललित गद्य एक तर लघुनिबंधाप्रमाणे आत्मविष्कारप्रधान होते किंवा कित्येक नवकथांप्रमाणे, मर्ढेकरी कादंबरीप्रमाणे मनोविश्लेशणप्रधान होते. आत्मविष्कारात्मक प्रेरणेमुळे लेखनात जीवशास्त्रीय उत्कटता येते व तिचा एक संसर्गजन्य, सुखकर पण कलाबाह्य असा तीव्र परिणाम वाचकाच्या मनावर होत असतो- अधिकांश प्राचीन अभंगसाहित्य व पुष्कळशी अर्वाचीन तथाकथित भावकविता, प्रांजळ आत्मचरित्रे हे या कोटीतील साहित्य होय. रेगे यांचे ललित गद्य आत्मविष्कारप्रधान नाही हे पुनः पुनः सांगावयास हवे असे नाही. बहुधा एका प्रसिद्ध पाश्चात्य नवकवीप्रमाणे रेगेही सतत स्वतःशी म्हणत असतील 'साहित्य म्हणजे स्वतःच्या भावनेचा, व्यक्तित्वाचा आविष्कार नव्हे तर स्वतःच्या भावनेपासून, व्यक्तित्वापासून दूर जाणे होय.' कुसुमाग्रजांच्या कवितेने स्वतःला अव्यक्तिगत करून घेण्यासाठी (पात्र-प्रसंगनिष्ठ नाट्य आणि) अव्यक्तिगत, ग्रांथिक अशा संस्कृतप्रचुर भाषेचा अवलंब केला, रेगे यांच्या कवितेने, कथा-कादंबरीने स्वतःला अव्यक्तिगत करून घेण्यासाठी संस्कृत-प्राकृत-पाश्चात्य इत्यादी वाङ्मयीन आणि सांस्कृतिक परंपरा आत्मसात केल्या. त्यांच्या सर्व साहित्यप्रकारांत, साहित्यकृतींत मानल्याने स्त्रीपात्रे, स्त्रीमन, स्त्रीधर्मजिणेपणा दिसत असूनही हा निर्माल्याचा आत्मविष्कार आहे असे वाटत नाही कारण यात कुठेही 'स्त्री' या घटकाला लौकिक आविष्कारातुरता, साधनात्मकता यांचा स्पर्श झालेला नसतो. खरे त्याला 'सृजनशक्ती' वगैरे अशा काही गाडगीळ किंवा स्वतः रेगे म्हणतात तसा प्रतीकात्मक अर्थ-म्हणजे अप्रत्यक्षरीत्या आत्मविष्कारच- असा तरी संदर्भ मिळतो का ? कथा-कादंबरीच्या क्षेत्रात काफ्का आणि खानोलकर जी. ए. यांनी अशा प्रतीकात्मक आत्मविष्काराच्या संदर्भात थोर यश मिळविले आहे. परंतु बहुधा प्रतीकात्मक अर्थ हा तार्किक अर्थच असतो व अर्थातच त्यावर कलाकृतीची संघटना आणि तिची महात्मता अवलंबून नसते. रेगे यांच्या ललित गद्यातून व विशेषत. त्यांच्या नाटकांतून, कादंबऱ्यांतून पॉझिटिव्हिझम आणि एक्झिस्टेंशॅलीझम यांचे क्वचित दर्शन घडते हे खरे व तेवढ्या अर्थाने त्यांच्या त्या त्या कलाकृतींत प्रतीकात्मक आत्मविष्कारच असतो; त्यांच्या कथा मात्र अशा प्रतिकात्मक आत्मविष्कारापासूनही सर्वस्वी अलिप्त राहतात.

वाङ्मयकृतीमध्ये पात्र-प्रसंग-व्यक्तिदर्शन-कथाबंध यांना केंद्रस्थान मिळाले म्हणजे त्यात कालसंदर्भ अनुस्यूत होतो, असा कालसंदर्भ भावानुभूतींचे नियंत्रण करावयास लागला की त्या लेखनकृतीची संघटना कार्यकारणतत्त्वावर म्हणजेच तर्कतत्त्वावर होऊ लागते; व्यक्तिदर्शन-कथाबंध यांना कह्यात ठेवून रेगे यांनी कालपरिमाणावर व कार्यकरणतत्त्वावर-तर्कतत्त्वावर विजय मिळविलाच; लौकिक पातळीवर आत्मविष्कार किंवा तात्त्विक पातळीवरील प्रतिकात्मक आत्मविष्कार सहसा टाळून त्यांनी-निदान त्यांच्या कथेने-जीवशास्त्रीय साधनात्मकतेवर व पुन्हा एकदा तार्किक संगतीवर विजय मिळविलाच; शिवाय नवसाहित्याला मनोविश्लेषणाच्या मोहामुळे ज्या साहचर्यतत्त्वाचा, मानसशास्त्रीय संगतीचा मोह होतो तोही त्यांनी कटाक्षाने टाळला. मर्ढेकरांनी आपल्या कादंबऱ्यांत जाणूनबुजून तसा प्रयोग

केला– एकाच लेखनकृतीत साहचर्यसंगती व लयसंगती या उभय संगती साधतात का हे जोखून पाहण्याचा त्यांनी जाणूनबुजून प्रयत्न केला. रेगे त्या वाटेला गेलेच नाहीत. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांत साहचर्यसंगती या अर्थाने मनोविश्लेषण चुकूनही नाही; 'पुष्कळा'सारख्या कवितांमध्ये मात्र-अकारणच ?- असे प्रयोग रेगे करतांना दिसतात.

रेगे जर मनोविश्लेषण करीत नाहीत, पात्र-प्रसंगांना प्राधान्य देत नाहीत, प्रतीकात्मक अर्थ अपवादानेच योजतात, लौकिक स्वरूपाच्या आत्मविष्काराचा त्यांना तिटकारांच आहे, समकालीन–किंबहुना कोणत्याही काळाशी, विशिष्ट समाज-संस्कृतीशी–त्यांची भावानुभूती कायम अनुबंध राखीत नाही तर ती साकार तरी कशी होते ? तिचे स्वरूप तरी काय ?

या प्रश्नांच्या उत्तरासाठी प्रथम आपण आपल्या मनातील काही समज-गैरसमज दूर केले पाजेहित. कदाचित त्यासाठी आपल्याला फॉकॉल्ट, लँकन, लेव्ही–स्ट्रॉस, बार्थेस (उच्चाराची. चूकभूल देणे-घेणे !) इत्यादींचा स्ट्रक्चरॅलिझम समजावून घ्यावा लागेल; निदान, जीवनाला काहीएक अर्थ असतो आणि तार्किक किंवा अन्य पद्धतीने तो आपण समजून घ्यायचा असतो, अथवा जीवनाला काहीएक अर्थ नसतो आणि आपल्या प्रज्ञेने, निष्ठेने आपण तो त्यास द्यावयाचा असतो, कलाकृतीमध्ये आशय आणि अभिव्यक्ति असे दोन घटक असतात आणि श्रेष्ठ कलाकृतीत ते जास्तीत जास्त एकरुप होत जातात इत्यादी आपल्या समजुती आपण रेग्यांच्या साहित्यकृतींचे आकलन–मूल्य मापन करतांना दूर ठेवल्या पाहिजेत. त्यांच्या वाङ्मयकृतींबावत आशय आणि आकृती या शब्दांत बोलणे शुद्ध अन्याय आहे; गैरसमज होणार नसेल तर, खरोखरच त्यांच्या वाङ्मयकृतीला आशय ही नसतो, आकृतीही नसते. ती निव्वळ भावनुभूतीची लयतत्त्वानुवर्ती घडलेली संघटना असते.

भावानुभूतीतील तर्कशास्त्रीय, मानसशास्त्रीय अशी लौकिक आवश्यकता काढून घेण्यासाठी रेगे अनेक कलात्मक तऱ्हा योजत असतात : त्यांच्या भावानुभूतीची भाषा मराठी असते पण भावानुभूतीचा परिसर, वातावरण, पात्रे, प्रसंग, जीवनसरणी हे सारे अमराठी असते. बंगलोरी, बंगाली, सिलोनी, जर्मनी असे नायक–नायिका योजून विशिष्ट भाषेचा, विशिष्ट स्थळकाळाशी, राहणी सरणीशी जो संबंध असतो तोच अशा रीतीने रेगे तोडून टाकतात ; भाषेला ते अशा रीतीने तिच्या सर्व लौकिक ऋणानुबंधातून मुक्त, स्वच्छ करून एका कलेचे केवळ साधन म्हणून, निखळ भावानुभूतीचा निव्वळ घटक म्हणून अस्तित्व मिळवून देतात. (म्हणूनच त्यांचे गद्य हे मुक्तछंद प्रमाणे मुक्त गद्य असते.) पात्र-प्रसंग असे परप्रांती – परदेशी म्हणून तिथल्या तर्री समाज–संस्कृतीचा वारसा, स्पर्श त्यांना व्हावा – तसे झाले असते तर रेग्यांच्या वाङ्मयकृती या भाषांतरित वाङ्मयकृती वाटल्या असत्या, पण तसे तर चुकून-चुकूनही घडत नाही. परप्रांतात-परदेशात आपल्या पात्रांना रेगे पूर्ण अनोळखी, अलिप्त ठेवतात, तिथल्या स्थलकाल सापेक्ष वागणी–राहणीचा आपल्या पात्रांवर ते बिलकुल संस्कार होऊ देत नाहीत किंवा मग त्या पात्रांच्या स्थलकाल सापेक्ष वर्तनाला, त्यांच्या लौकिक, बाह्य जीवनाला अगदीच नगण्यस्थान आहे, आंतर जीवनाच्या स्थलकालातीत माणसाच्या निखळ सनातन भाव-जीवनाच्या–संदर्भात फक्त विरोधानेच, विरोधलयानेच स्थान आहे असे दर्शवितात. मानवी मनातील मूलभूत, संस्कृतिनिरपेक्ष अशा भावभावनांची, इच्छा–आकांक्षाची तलम जाण असलेली रेगे यांची पात्रे जशी लौकिक स्वदेश आणि लौकिक स्वकीय सोडून आलेली असतात तशीच ती लौकिक अर्थाने रूक्ष जीवन जगणारी– इंजिनियर, मॅनेजर, एजन्ट, इतिहास संशोधक अशी असतात; कवी, चित्रकर, गायक अशी नसतात. रेगे यांना यात रूक्ष जीवन विरूद्ध भावार्थ आंतरिक जीवन एवढाच विरोध अभिप्रेत नसतो ; इथे जी भावानुभूती साकार होते आहे ती पूर्णपणे स्थलकालनिरपेक्ष, सनातन, मूलभूत, सार्वत्रिक अशी आहे असे त्यांना त्यातुन सतत सुचवावयाचे असते.

आणि अशी स्थलकालनिरपेक्ष, सनातन, मूलभूत, सार्वत्रिक भावानुभूती कोणती ? रेगे यांच्या वतीने उत्तर अगदीच साधे आणि स्पष्ट आहे : जगण्याची भावानुभूती, शिकंदराच्या स्वाऱ्यांपासून महायुद्धापर्यंत, स्वार्थापासून निःस्वार्थ प्रेमापर्यंत, तत्त्वज्ञानापासून अडाणीपणापर्यंत सर्वत्र ही जगण्याची भावानुभूती. यात मानवनिष्ठ आणि निसर्गनिष्ठ असेही विभाजन नाही– इथून तिथून एकच जीवनोत्सव, अस्तित्व, रेगे यांचा असा विश्वास आहे की कुठलाही मानवप्रणीत वा अन्य प्रलय हा जीवनोत्सव, हे अस्तित्व, ही जगण्याची भावानुभूती–

(पान २७९ वर)

वनफूल'च्या निमित्ताने

श्री. म. म. देशपांडे यांची कविता*

प्रभा गणोरकर

श्री. म. म. देशपांडे यांचा 'वनफूल' हा कविता-संग्रह वाचताना त्यांच्या कवितेचे साधेपण विशेषत्वाने डोळ्यात भरते. सुमारे एक तपाच्यावर म. म. देशपांडे कविता लिहीत आहेत. विंदा करंदीकर, बापट, पाडगावकर, रेगे, इंदिरा यांनी जिंकून घेतलेल्या या कालखंडात म. म. ची कधीमधी प्रकट होणारी एखाद-दुसरी कविता तिच्या साधेपणामुळेच लक्षात राहून जाई. करंदीकर बापट आदींनी जिंकलेल्या या काल-खंडाचे मूळ मर्ढेकरापर्यंत पोचते. 'आधुनिकते'च्या—'नवते'च्या नादामुळे आशय आणि अभिव्यक्ती पद्धतीत बंडखोरी करण्याचा मूळ हव्यास पुढील कवितेत परा-कोटीला पोचला. मर्ढेकरांच्या 'भावनानिष्ठ समतान-तेच्या' चर्चेमुळे प्रतिज्ञा-प्रतीकांचे प्रमाण फार वाढले व कविता आपले साधेपण गमावून बसली. कृत्रिम बनली, आधुनिकतेच्या नव्या वाटा धुंडाळणाऱ्या नंतरच्या कवींमध्ये आशयाचा ठाव घेण्याची ताकद कमी आणि केवळ नव्याचे आकर्षण अधिक त्यामुळे ही कविता अधिक पसरट व बटबटीत झाली. प्रतिमांची खैरात, रचनेची हेतुपुरस्सर मोडतोड व जुन्यास विरोध कर-ण्याची वृत्ती यामुळे ही कविता मूळ मर्ढेकरी कविते-पासून फार दूर गेली. कारण मूळ मर्ढेकरी कवितेतील आशय जटिल, मुरलेला. आणि तिची रचना सरळ, आटीव, आटोपशीर असे. निखळ मानवतेवर संस्कृती-वर, मूल्यांवर अतीव श्रद्धा आणि ती जपण्याच्या पोट-तिडिकेमुळे बंडखोरीची सिद्धता हे दोन वृत्तिविशेष मर्ढेकरांच्या कवितेत द्वंद्वरूपाने, नाट्यमय आकार घेऊन येतात. मर्ढेकरांच्या कविता अतिशय भेदक—उग्र-उद्रेकी, पण याहून तिचा एक वेगळा विशेष म्हणजे ती कविता सहज, अनलंकृत, निखळ स्वरूपाची आहे. 'मर्ढेकरांची कविता' या संग्रहातील—'पोरसवदा होतीस'. 'आला आषाढ-श्रावण', 'ओहोटीच्या काठावर', 'नाही शोधीले गावाला', 'कुठेतरी केव्हातरी-जाणे असे हे चकून' अशा कितीतरी कविता उदाहरणार्थ देता येतील.

मर्ढेकरांच्या कवितेतील जो विशेष इतर आधुनि-कांनी टाळला, तोच नेमका म. मं. नी उचलला—किंवा त्यांना अधिक मानवला. म. मं. च्या पूर्वी मर्ढेकरां-शिवाय अनिलांची कविता अशी साधी असे. (त्याहीपूर्वी रे. ना. वा. टिळक यांची कविता.) अनिलांच्या 'फुलवात' व त्याहीपेक्षा 'पेर्ते व्हा' या संग्रहातल्या कविता कमालीच्या साध्या व सहजसुंदर आहेत.

> 'आला हा पाऊस—आला पाऊस
> मातीचा मरला-उन्मत्त वास'
> किंवा 'बाई या पावसानं-लाविली झिमझिम ।

भिजविलं माळरान-उदासलं मन अशा, पण अनि-लांच्या कवितेचे हे साधेपण आणि म. मं. 'वनफूल'चे साधेपण हें एकसारखे नाही, त्यांची जातच भिन्न आहे. म. मं. च्या कवितेला हा वेगळेपणा मर्ढेकरी प्रवाहामुळे लाभलेला, आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे अनिलांच्या कवितेत आत्मतृप्ती दिसते. खूप सुखावलेला, तृप्त जीव आपलें सुखाचे अनुभव न शृंगारता सांगतो. या सुखी मनाच्या क्वचित-विरहवेदना, दुःख ही सुद्धा हळव्या, रोमँटिक आविर्भावाने, सहजपणे, आकांत न करता व्यक्त होतात. म. मं. च्या कवितेतही सहजअभि-व्यक्ती ही सुखी माणसाच्या सुखःदुःखाच्या अभिव्यक्ती-सारखी नाही, विलक्षण सोसून शांत झालेला माणूस आपले अनुभव जसे सांगील तशी ही कविता आहे. मन मोकळे करायचे आहे पण जीवीचा उमाळा आवेशपूर्ण उद्रेकाने बाहेर फुटत नाही, सारे नुसते संयपणे झरते. या झरण्याचा एक मंद सूर असतो. तसा प्रत्येकच कवितेला एक सूर असतो, आवाज असतो आणि त्या आवाजावरून

*हा लेख श्री. संभाजी कदम ह्यांच्याशी झालेल्या चर्चेतून तयार झाला.

तिची एक निश्चित जागा वाचकाच्या मनात ठरून जाते. म. मं च्या कवितेला गाभाऱ्यातला शांत थंडगार काळोखात खांबाशी टेकून बसलेल्या सोशीक डोळ्यांच्या स्त्रीचा आवाज आहे. ही स्त्री आपल्यासारख्याच दुसऱ्या स्त्रीला मनातले काहीतरी सांगते आहे. त्या सांगण्यात दुःखाचा आक्रोश नाही आणि त्या ऐकण्यात सवंग प्रकारची उत्सुकता नाही. म. मं. च्या कवितेचे हे चित्र डोळ्यांपुढे उभे राहते. आपण ही कविता वाचतो तेव्हा जणु ते मन समजावून घेत असतो. खूपदा या मनाचे हे अनुभव, ही दुःखे आपणही अनुभवलेली असतात. 'आज वाटते उदास-क्षिण गळले सुखाचे-मनी पाचोळ्याची रास'—असे कधीतरी आपल्यालाही वाटून गेलेले असते. त्यामुळे ही कविता 'कळते', कवितेचा आणि आपला संवाद घडतो. ते एक 'हितगुज' बनते. याच ठिकाणी आणखी एक गोष्ट जाणवते, व म. मं. ची कविता आणखी एका दृष्टीने वेगळी ठरते. 'वनफूल' वाचताना 'अभिसार' लिहिणाऱ्या कवी ना. घ. देशपांड्यांची अनेकदा मधून मधून आठवण होते. तसा ह्या दोघांमध्ये खूपच फरक. पण 'अभिसार' मधली ना. घं. ची कविताही अशीच विचारघन, खूप सोसलेली; तिची रचनाही आलंकारिक, दिखाऊ नाही. प्रतिमा-प्रतीकांची रेलचेल नाही. पण तीत सर्वत्र जीवघेणे ताण आहेत. तिची रचना कडेकोट नाकेबंदीसारखी. म. म. जे काही सांगायचे ते अगदी मोकळेपणाने सांगतात. ना. घ. हात राखून. आधी ही कविता ओठ घट्ट मिटून बसलेली असते बोलते, पण नाइलाज झाल्यासारखी मिनतवारीने-'तुम्हाला काय सांगायचे यातले-तुम्हाला काय कळणार'-अशा आविर्भावाने वाचकांना ती दूर ठेवते. ना. घं. ची अभिव्यक्ती अशी आडवळणाची. वळसे घेत घेत ते सांगतात—

> प्रत्येक प्रयाणाला येते मागची पुढे आडवी आणभाक
> प्रत्येक पावलाशी आहेत कोरलेल्या बंधनरेषा लाख
> —अभिसार

या ओळीतील प्रत्येक शब्द क्रमाने पाहण्याजोगा आहे. शेवटचा शब्द आल्याशिवाय काय घडते आहे, कवीला काय म्हणायचे आहे याचा थांग लागत नाही. अर्थाबद्दलच सस्पेन्स. आणि त्याचा शेवटी रिलीज, या दृष्टीने त्यांच्या 'उगीच काही' (४०), 'प्रेरणा' (६) 'तेंथून (७)-अशा अनेक कविता पाहता येतील, 'अभिसार' पूर्वी अत्यंत मोकळेपणी बोलणारा हा कवी 'अभिसार' मध्ये प्रेयसीशी बोलताना सुद्धा सुरवातीला इतरच काहीतरी बोलत असतो, अगदी रुक्ष सुद्धा. मग वळणावळणाने ते मुद्यावर येतात आणि शेवटी चटकन् भडभडून बोलून जातात ('नको माझ्याही डोळ्यास आणू पाणी'—वगैरे). अंतर्मुख वृत्तीचा हा अवघडलेपणा ? की संवाद साधण्याचेच नाकारण्याची वृत्ती ? 'सवयच नाही कुणापाशी काही बोलण्याची'-ही ओळही अशीच. काहीशी आढ्यतेकडे झुकणारी.

म. मं. मध्ये हे होत नाही. इथे वाचकाशी मनमोकळा हृदयसंवाद होतो. सारे कसे स्पष्ट. मग 'दुखतच नाही त्याला दुःख तरी कसे म्हणू'—म्हणायचे असो किंवा 'आहात तसे सुखात असा' असा औपरोधिक टोला असो. या सरळपणामुळेच जड वैचारिक आशयसुद्धा मोकळे भावरूप घेऊन येतो. दाटून आलेला ढग कुठलेही प्रयास न पडत झरत राहावा तेवढ्या सहजपणे नेमक्या आणि मोजक्या शब्दात. खूपदा ते आपल्या परिचयातली ढोबळ रूपके वापरून जातात 'जागृतीच्या वृक्षाखाली-स्वप्नपाकळ्यांचा सडा-' अशी. पण ती आशयाशी इतकी एकरूप झालेली असतात की त्यांचे रूपकत्व वेगळे जाणवत नाही. 'आता ओंजळीलाही वेगळं अस्तित्व उरलं नाही-धारेतच उतरल्यावर'—तसेच हे. बंडखोरी, आधुनिकतेचा देखावा, रचनेच्या करामती, प्रतिमांची झुंबरे असा हव्यास येथे नाही. (रचनेचे प्रयोग ते कधी कधी करतात तेव्हा कविता कोलमडते : उदा : 'छोटे मासे-मोठे मासे'—वगैरे).

उलट, आधुनिक बंडखोरीचे वारे प्यालेल्या लोकांतील उपरेपणा, आंधळेपणा व वैचारिक दिवाळखोरी म. मं. ना अस्वस्थ करते. संस्कृती-विरोध, श्रेयसविरोध, जे जे प्रस्थापित, स्थिरावलेले त्या त्या सर्वांना विरोध मूल्यविरोध, मूळ जीवनावरचा अविश्वास, अश्रद्धा-ही जी आजच्या काही अतिआधुनिकांची वैचारिक पोज आहे तिला म. मं. च्या कवितेतून उत्तर मिळते—

> "तुम्ही बघा रेताडात अपुले मुख-
> नदीच्या मी झुळझुळत्या जळात बघेन
> ज्याच्यासाठी तुम्ही इतके विवश होता
> त्याच सत्याच्या सान्निध्यात मी हसेन-"

रेताडात प्रतिबिंब पाहयचे आणि दिसत नाही म्हणून व जीवनावर अविश्वास दाखवायचा अशा

मूर्खपणाला हे उत्तर आहे. नदीच्या झुळझुळत्या पाण्यात-म्हणजे पर्यायाने जिवंततेत ते पाहयला हवे. 'तत्त्वज्ञाने विसरून सारी—फक्त जाणतो जिवंतता' या विचाराला मिळते जुळते असे म. मं चे हे जीवनविषयक चिंतन आहे. 'वनफूल' हा संबंध कवितासंग्रहच चिंतनात्मक आहे. जाणीवेच्या, तर्काच्या, बुद्धीच्या पलीकडचे पण खोल कुठेतरी मनाला भासलेलें अव्यक्त कवी शोधतो आहे. ही कविता त्या अखंड आणि प्रामाणिक आत्मशोधाची वाटचाल आहे. कवीच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या बैठकीमुळे कवितेला सुस्पष्ट असे वैचारिक स्वरूप आलेले आहे. आणि भावकवितेत संभवू शकणारी कथनाची अस्पष्टताही येथे टळली आहे. कविमनाचे संपूर्ण व स्वच्छ प्रतिबिंब कवितेत उमटलेलें दिसते.

--"अंतरिक्ष फिरलो पण गेली न उदासी
लागले न हाताला काही अविनाशी" (पृष्ठ३)

किंवा

"दिक्कालाच्या प्रचंड घुमटात
एकटाच असतो तेव्हा मी पुकारतो: 'कुठे आहेस?'
तेच शब्द सर्व बाजूंनी प्रतिध्वनित होतात !

'कुठे आहेस ?'
'कोण ?'
पुन्हा तेच. 'कोण'
प्रतिध्वनींनी हवेचा कण न् कण निनादतो.
खरोखर मला कोण हवे असते ?" (पृष्ठ ५)

शिवाय, 'माझे मीपण दिसेना' (९), 'भार' (८), 'तहान' (१४) 'पश्चात्ताप' (१७), 'नाही उत्तर देता येत' (३६), 'मनाच्या बंद दारावर' (४०). 'ज्ञान' (४३), 'लाख लाख द्वंद्वे' (४५), 'हाक' (४६), अशा कितीतरी कवितांवरून म. मं. च्या या आध्यात्मिक प्रवासाची वाट स्पष्ट दिसते.

या सखोल चिंतनातूनच 'काय नाकारावं आणि काय स्वीकारावं--जिथं सर्व माझंच आहे' असा व्यापक दृष्टिकोण निर्माण होतो. स्वतःचे स्थान गवसल्याचे आढळून येते. त्याबरोबरच 'कुठेतरी उंच तरळत असतो-- तुमच्या दृष्टीनं मी तेव्हा पायातळी असतो—'असा भोवतालच्या जगाशी हळूहळू होत चाललेला विसंवाद जाणवू लागतो 'पलीकड'च्या तीरावर दृष्टी ठेवणारे या जगात 'वेडेपीर' ठरतात हे सनातन सत्य प्रत्ययाला येऊ लागते—आणि मग इतरांना' आहात तसे सुखात असा' असे सांगण्याइतकी निर्मम आणि स्थिरावलेली वृत्ती येते. जीवनाचे हे फार मोठे दर्शन आहे. सामान्यांच्या दृष्टीपलीकडे असणारा हा आयुष्याचा अर्थ म. मं. ना कळलेला असतो. यातूनच एक प्रकारची अलिप्तता, तटस्थता येते. 'प्रेम केले कुणी—कुणीदगड मारले'—हे दोन्ही अनुभव मन सारख्याच अलिप्तपणाने घेते. भोवतालच्या जगापासून नाळ तुटल्यासारखे वाटते. 'इथला असूनी—इथला न झालो-' अशी प्रचीती येते.

पण असे जरी असले तरी म. मं. चा जीवनासंबंधीचा दृष्टिकोण कडवट निराशेचा किंवा नकारात्मक ठरत नाही. कारण मुळात ही कविता वैतागातून निर्माण झालेली नसून वैचारिकतेतून निर्माण झालेली आहे. "नाना पातळ्या मनाच्या आणि चढायला जिने—" असे विविध पातळ्यांवरून मन समजून घेतलेले असते. आणि म्हणूनच—"वर जावे तसा होतो आपोआप नम्र माथा—" त्या उंचीने त्यांना भोवळल्यासारखे होत नाही, जीवनातील सर्व मंगल-अमंगल, सुकृत-विकृत, कुटिल-जटिल पाहूनही दृष्टिकोण नकारात्मक तर होत नाहीच, पण—

"नाही खाई राहिलेले माझे मन
उंबरठा तो आहे एक प्राणाचा.
अतिथी बनून आलेला प्रत्येक किरण
येथील रहिवासी होतो जानाचा.
प्रत्येक द्वार महाद्वार जीवनाचे
झाले नाही जरी दर्शन गाभाऱ्याचे
दिशा कळली हेच काय थोडे झाले
मात्र सोबत सोडू नकोस माझे-वाचे"

या नितांतसुंदर कवितेत म्हटल्याप्रमाणे 'दिशा कळल्याचे' समाधान ठिकठिकाणी प्रकट होते.

हा अलिप्तपणा, अशी विशिष्ट समदृष्टी,—काहीशी ममतापूर्ण साक्षी वृत्ती, येण्याला कोणती निराशा कारणीभूत झाली असावी याचा अंदाज 'वनफूल' मधून येऊ शकत नाही. (जसा मर्ढेकरांच्या कवितेतून येतो) किंवा या आध्यात्मिक वाटेवर लौकिक अशा निराशांना अर्थच उरत नसावा.

'पिवळा नि तांबूस स्टेशनचा तम
वेदनेनंतरचा वेदनेचा भ्रम'—

अशी वेदनाच नाहीशी झाली आहे. ती होती की नव्हती हा भ्रम शिल्लक आहे वेदनेची आच संपल्यावर तिचे दुरून—विहंगदृश्यासारखे—दर्शन घेतले गेले आहे.

'वनफूल-त्याला आवडते धूळ-गाई उदास गाणे'-पण उदास म्हणजे दुःखी निराश नव्हे. वैराग्यपूर्ण. उदासीन–रंगहीन. (कलरलेस)–(वनफूल'च्या मुखपृष्ठावरचा 'वनफुला'चा उदास, मंद पांढरा रंग या दृष्टीने लक्षणीय आहे.) म. मं. च्या कवितेच्या या विशिष्ट स्वभावातूनच तिचे आणखी काही गुणदोष निर्माण होतात. एकूण कवितेची वृत्ती अशी स्थिरावलेली असल्यामुळे म मं. ची कविता एकसुरी होऊ लागते. सर्व कविता 'सम'–सर्वदूर सारखी वाटते. कुठेही तीव्र चढउतार नसतात. ना. घ. देशपांडयांच्या कवितेसारखी म. मं. च्या कवितेची एखाद दुसरी ओळ चटकन पाठ झाली, मनात ठसली–असे होत नाही. ही कविता मनात संथपणे झिरपते. त्यांनाही कधी 'फुलांची गाणी' गावीशी वाटतात पण 'जिभेला कुणी दंश केलासे वाटते'

'काहिच नसता आगेमागे—विणीत बसला सुंदर धागे
कधि अनुरागे कधि—लोभाने—मोहित होतो मधु-
गाण्याने पण ऐनवेळी या साऱ्या सौंदर्यातले निरर्थकत्व
जाणवते–

'परंतु माझा मीच नसे जर,
वस्त्राविण ही नुसती भरजर'.

आणि म्हणून या संग्रहात उत्कट प्रेमकविता, निर्भर धुंद प्रणयभावना गुंफलेली कविता निखळ निसर्गकविता जवळजवळ आढळतच नाहीत. 'दिलासा', 'सांज' (३१) 'फुलपाखराचे पंख' (३२), 'सरेल ही रात' (३४) अशा काही कविता त्यांच्या एरवीच्या मूडपेक्षा वेगळा, प्रसन्न हलकाफुलका मूड दाखवतात. म. मं. चे मन धुंद उत्कट होतच नाही की काय असा प्रश्न पडावा इतके या कवितांचे प्रमाण कमी. म. मं. ची संथ-समतोल वृत्तीच याला कारणीभूत ठरली आहे.

नकारात्मक दृष्टीतून आधीचे भणंग, वकाल जीवन-कलहाचे दृश्य पहिले की भावनेचा उद्रेक अपरिहार्यच असतो. तो तोलण्यास कवित्वशक्ती फार मोठी लागते हे खरे, पण याच उद्रेकामुळे कलाकृतीला आपोआपच एक भव्य परिमाण लाभते. (हा उद्रेक खोटा असेल त्यावेळी तो आक्रस्ताळी, अभिनिवेशी ठरतो.) जीवन-कलह मुळातच इतका उग्र आहे की त्याबद्दल नकारात्मक दृष्टी तयार होणे स्वाभाविक. उलट होकारात्मक दृष्टीने हे सर्व पाहणे काहीसे कठीण. पण अशा होकारात्मक दृष्टीने पाहताना. कधी कधी सुस्त, कलाहीन आत्मतृप्ती तरी येते किंवा जीवनकलहातील द्वंद्वात्मक नाट्य दिसेनासे होते, म. मं. मध्ये कलाहीन आत्मतृप्ती नाही. जीवनकलहातील नाट्याची सुयोग्य जाण आहे—मग कमी काय आहे ?—

जीवनेश्वराची ही मिरवणूक ते 'दुरून' पाहताहेत. तीत मिसळत नाहीत. मर्ढेकर तिच्यात मिसळतात. प्रेम करतात, दगडही मारतात. म. मं. ना. 'गाभाऱ्याचे दर्शन न झाल्याची' थोडी खंत वाटते—पण त्यामुळे त्यांच्या मनाला पीळ पडत नाही. 'दिशा कळली हेच काय थोडे झाले' असे स्वतःचे समाधान ते करून घेतात. आणि तेवढ्यावरच थांबतात.—वाचेच्या सोबतीने तेवढे (—तर तेवढे) साकार करतात. मर्ढेकरांना जीवनकलहाच्या गाभाऱ्यात शिरून 'भव्य भीतीचे' दर्शन घेण्याचा ध्यास होता. पण समदृष्टीने जीवनकलह पाहायचा तर तो दुरूनच पाहावा लागणार. मिरवणुकीत मिसळायचे तर समदृष्टी जाण्याची शक्यता आणि भीती. त्यात मिसळून एकरूप झाल्यास बेहोषी—धुंदी मिळू शकते, ती म. मं. मध्ये नाही. दुरून पाहिल्याने या प्रकारची बेहोषी आली नाही तरी दुसऱ्या प्रकारची येऊ शकते. केवळ साक्षी वृत्तीने जीवननाट्यातील द्वंद्वाची लय पाहता आली तर त्या लयीनेही धुंद होता येते. म. मं. मध्ये समदृष्टी आहे पण लयीची ही धुंदी नाही. या दोन वृत्तींपैकी एखादी साधली की दुसरी हातून सुटते, वृत्तींची निवड अशी काहीशी जागरूकपणे बौद्धिक पातळीवर झाली की अनुभवाला मर्यादा पडतात. (टी. एस् इलियटसारखा कवी 'वेस्ट लॅन्ड' आणि 'बर्न द नॉर्टन' मध्ये या दोन्ही वाटा सारख्याच समर्थपणे चोखाळू शकतो. मर्ढेकरांनी पहिली समर्थपणे चोखाळली) म. मं ची दुरून पाहण्याची वृत्तीच त्यांच्या पुढच्या वाटचालीला अडथळा बनते.

म. मं. चा साधेपणा हा कित्येकदा काव्यहीन. बेचव गद्य होऊ लागतो. 'वनफूल'मधल्या 'भ्रम', 'नाच', 'अशांत वारा' या काही कविता आणि अलीकडे प्रसिद्ध झालेल्या काही सुटचा कवितात हा बेचवपणा आढळतो. कित्येक ठिकाणी स्वतःचे मूड्स् निसर्गावर लादले

(पान २७२ वर)

एक अप्रसिद्ध कवि

फुरसतलाल

बा. सां. भटगरे, वरोडा

फुरसतलाल मणिराम मिश्र हे अत्यंत बुद्धिमान, मुत्सद्दी तथा काव्याचा व्यासंग असलेले पटवारी कायरला होऊन गेले. कायर वणीच्या दक्षिणेस (जि. यवतमाळ) १० मैलावर आहे. कायर हे नांव फार्शी शब्द 'कयार' (पाण्याचा साठा) वरून पडले असावे. कायरला पाण्याचे जिवंत झरे आहेत. येथूनच विदर्भा उगम पावली. यवतमाळचे इतिहास संशोधक श्री. द. वा. महाजन आपल्या 'कायर' मध्ये विदर्भेबद्दल लिहितात, "एखाद्या महाराज्ञीने आपल्या हाताखालील दासीच्या अंगावरील एकच लेणे घेऊन आपल्या अंगावर घालून सौंदर्य संपन्न व्हावे, त्याप्रमाणे समृद्ध अशा वरदा नदीने 'विदर्भा' हे नांव धारण करून पुराणात प्रसिद्धी मिळविली." ('भारत', यवतमाळ, दि. १-८-५४) कायर बरेच प्राचीन असून येथे सातवाहनकालीन दोन शिलालेख मिळाले आहेत. कवि गोविंद मूळचे येथलेच. 'कायर प्रसंगात' फुरसतलालने विदर्भेची महती गाईली ती अशी

" काळी सनील सरिता जणु ती अकाली ।
आली तळोनि सुरभी धनवत्स व्याली ॥ "

धन अन्नाचे, स्थळ मानाचे, विराम वरुणाचे अशा या कायरबद्दल ते लिहितात:

"शालिसमृद्धी सरिनपथ जो पुरवै करतार ।
कायरवास सुवास है यथा सतीहि भरतार ॥"

फुरसतलाल नावाप्रमाणे फुरसत काढून काव्य रचना करीत. त्याच्या काही वह्या उपलब्ध आहेत. एका नोंदवहीत दिलेल्या संकल्पित रचनेवरून त्यांच्या काव्याची कल्पना येते. यांची रचना फुऱ्या, फुरसतलाल, मणिसुत, सेवक, दास या नावाने मिळते. येथे त्यांच्या काव्याचा थोडक्यात परिचय देण्याचा प्रयत्न करीत आहे.

अभंगकट्वागदा:– यातून कवीने समाजाला दिलेली शिकवण अत्यंत यथार्थ तथा उद्बोधक आहे.

देह समाजाचा ठेवा । त्याचा मोह मूढा हवा ॥
पोते चोरट्याने नेले । बिगाऱ्याचे काय गेले ॥
द्रव्य वसुधेचा भाग । त्याचा व्यर्थ पाठलाग ॥
संपादक किती झाले । सवे कोणी नाही नेले ॥
यज्ञाविण अन्न खाणे । तेंचि पापरूप जिणे ॥
केले जे का संपादन । यज्ञ विभाग त्यातून ॥
लोक स्थितीशीं पाहून । युक्त कर्तव्य तो यज्ञ ॥
दृढ झाल्या आत्मध्यान । आत्मरूप होई मन ॥
मन एकाग्र झालीया । बंध मोक्ष नाही तया ॥
विश्व कुटुंब ते त्याचे । प्रेमे ब्रह्मपदीं नाचे ॥
उपकारी झिजे देह । ऐशा उरेना संदेह ॥

इति कट्वागदा फाग शु. २९ शके १८३०
(इ. स. १९०८)

मृतविसर्जन– ही अत्यंत छोटी रचना आहे. सुरवात दि ३-३-१९०९:

संगे जाहला स्वभाव । स्वभावाचे दोन भाव ।
एका भावे अनुराग । द्वेश दुसऱ्याचा भाग ।
फुऱ्या सांगणे बंधन । मोक्ष देई विसर्जन ॥२॥
थोडक्यांत सांगु सोय । ज्याने मोकळाची होय ।
जन्मासवे कर्म चालू । होत गळू लागे मळू ।
ऐसा सर्वत्र प्रत्यय । अया पाठी आहे व्यय ।
उद्भव तो जाणा अय । मृत होते तेंच व्यय ।
मृत त्यागे सर्व सिद्धी । नसे पाल्हाळ तो विधी ।
फुऱ्या म्हणे विषय पाच । मुक्ति सुटल्याने साच ॥३॥

रामधनअर्चना– यात मास–ऋतु वर्णन अत्यंत बहारीचे आहे. फक्त दोन पाने तेवढी शिल्लक आहेत.

गेला माधव सोडुनी गिरिसखे देशाटना कारणे ।
त्या योगें अवनी हिमश्रु श्रविती ईचे फिटो पारणे ।
चंद्रालागि चकोर तिष्टत असे मेघोदका चातकी ।
ऐसा दुष्ट शरद्‌ऋतू विनटला कामीजना घातकी ॥११॥

हिममय रिपु रात्री कष्टवी येकलीला ।
कठिण अति मला जो हा न बाधो पतीला ।।
रविरथ हितकारी वाटतो शीघ्रगामी ।
सहज निघुन जावो पौष हा दुष्ट कामी ।।१३।।

करि धरुनि तपातें लागला माघ मागे ।।
हळुहळुच हिवाला दाविता हा न भागे ।।
शिवनिशिम प्रदोषी अर्चुनी हा पुरारी ।
स्तवुनि वदतसे या मार तापास हारी ।।१४।।

वसंत शिशिरांत हा सबल शोभवी फाल्गुन
वनहमहि रंगले बहु रणी जसा फाल्गुन ।।१५।।

हुताशनिम अर्पुनी विरह पुष्प गंधाक्षता ।
सकाम मनि प्रार्थिते निववि देवि माझ्या क्षता ।।१६।।

मधू म्हणत याजला कवि न पाहतां दोष तो ।
नसेल ; पटु चैत्र हा कटु ! पहा रसा शोषतो ।।१७।।

कठोर पुरुष स्त्रिया त्यजुनि ते कसे राहती ।
भले नवल हे नद्या पतिकडे स्वयें वाहती ।।१८।।

वैशाख शाखा तरुपालवीतो ।
माझी तनूपंजर वाळवीतो ।।
कामाग्निने सर्व मदांग पोळे ।
वाटे रवीकीर्ण शिरीच लोळे ।।१९।।

जेष्ट अरिष्ट वलिष्ट दवानळ
साहृच दिनेश जयास असे तो ।
लोष्टहि पिष्ट करील गमे मज
भस्म करू शकेल कसें तो ।।
श्वेत दिगांबर वेष्टित ऊष्णचमूसह
ग्रीष्महि प्राणच घेतो ।
रुष्ट जयावरि इष्ट तयास
विरूद्ध सुमित्रहि होतो ।।२०।।

रसगूढ– ही रचना कवीने ४६ दोहृचांत पूर्ण केली आहे.

मणिमाणिक भुषण ठके चरण करत पयमाल ।
माहुर ललित सिंगारके वरनत स्फुरसतलाल ।।४०।।

असरस चरित सुनारिके ताके कहे साखि जौन ।
उत्प्रेक्षक निजदृष्टिसे मणिसुत रेखे तौन ।४१।।

विश्व सकल रसपाकसा लवन फबै शृंगार ।
लवन विना सब निरस है रसपति बजत नगार ।।४२।।

हेतुनिवशै वुद्धिमें तब अंकुरै उद्गार ।
परिचय उत्तर देत है समझो वहै सिंगॉर ।।४३।।

खराजक शृंगार जो प्रणवाक्षर मुनिध्येय ।
अधिपति आठौं रसनको जानि सुकवि तिहिसेय ।।४४।

जाबालनायक हिय कलपत रसगूढ

वहै तत्व शृंगारको अतर चखै जडमूढ ।।४५।।

ता. १५-१०-१९१०

शांत्यादी रसांचे अधिपत्य एका शृंगाराच्या पदरी ठेवण्याचे कारण की, (ॐ) इती जे मूळबीज ब्रिहाभिदान त्याच्या उच्चारातील चवीला शोभा आणणारी जी शक्ती ती या शृंगाररसाच्या अंगी आहे व म्हणनच गाणें, व्याकरण (खराजक) इत्यादी वर्णविषयक शास्त्रें या शृंगाराचाच आश्रय घेतात. सतत मौन धारण करून राहणाऱ्या तत्वज्ञात्यांच्या अव्यक्त भजनात (परा) या वर्णाच्या द्वारा खरा आधार या शृंगारशक्तीचाच आहे. एकंदर मानवी भाषातील बऱ्यावाईट अर्थाने भरलेल्या शब्दोच्चारास बळ, आवेश देणारी जी गुप्त शक्ती ती हीच. ज्या अव्यक्त मानसिक शक्तीच्या बळावर मनुष्यास आपल्या शारीरिक किंवा मानसिक सुखोत्पत्तीची कल्पना करता येते त्या शक्तीस पाठबळ, ज्या दुसऱ्या एका अकल्पित स्वयंभू आणि गुहृचास विशद करणाऱ्या चैतन्यशक्तीचे असलेले प्रत्येक कल्पक व्यक्तीच्या अनुभवास येते. यालाच या स्थळी कवीने ''रसराज शृंगार' मानले आहे. यात कवीची चूक होण्याची शक्यता आहे.

रसवल्ली– ' रसगूढ ' मधून या रचनेची निर्मिती झाली आहे. कवीने सुरवातीला नवरसांचा श्रीकृष्णाशी सुंदर मिलाप केला असून नंतर नायिका व नायक यांचे भेद स्पष्ट केले आहेत:

प्रथम धऱ्यो शृंगार राधिका मनहर कारन ।
अद्भुत गोपिन हेतु वीर कंसादिक मारन ।
सैरंध्रीहित हास द्रौपदिहित करुणा धऱ्यो ।
मल्ल भयानक रूद्र कुवल्यापीड पछाऱ्यो ।

बालकेलि धऱ्यो विभत्स शांति रहत नित संतचित ।
सुखचैन रसिक रसलें नवरसमे वृजराज नित ।६।।

इक नव दस सन ईसवी जुमेरात नवमास ।
तिथि ताकी थी पंधरवी ता दिन पुरी आस ।।

ता. १५-९-१९१०

स्मरणके प्रभाव भाव प्रगट करे रूप हिये चिते सो,
सुखद चरित अपने प्रिय ध्येय को ॥
चेते तच्चरित करत अनुकरण फुरत होत ताते,
बड विभव मिले स्मारक कर गेय को ॥

शेवटचे कवित घरून कवीने ७१ कडव्यात ' रस-वल्ली ' पूर्ण केली आहे.

प्रभुपरिचय– यात सुक्रात आणि अरिस्टेडिमस या दोघांच्या संवादातून विषय स्पष्ट करण्याचा प्रयत्न झाला आहे.

जैसे अप्रकट जीव मन तवहूं है परतीत ।
तैसे ईश्वर सत्य है नहि कहवो अनरीत ॥ २६ ॥
अलख ईश हैं जगतको यह मोरे मनमान ।
तदपि हमारे करमका नहि ताहे अभिमान ॥२७॥
समुझे पूजन ते तरे शेष रहे भव वूड ।
प्रभुको घटघट पावते हरषित मणिसुत मूढ ॥५१॥
चैत्र शुल्क नवमी शशी शक अठरावत्तीस ।
प्रभुपरिचय तवही भयो भयो रूद्र जव कीस ॥ ५२ ॥
इति ता. १८-४-१९१०

व्यक्तिरेखा– फुरसतलालची माहिती मिळविण्यास 'अभंग कट्वागदा'ची थोडीफार मदत होते. तुका वदे वेद वाणी । तुकारामाला गुरूस्थानी मानून ' फुऱ्या होता अंतरीला । गुरूकृपे ठायी आला ' अशी ग्वाही कवी देतात. सुर्ती मोत्याचा दाणा जसा स्वतःला वाखाणण्याबद्दल लोकांना सांगत नाही तद्वत फुऱ्या सर्वांगी सुंदर होता. सत्यनिष्ठ होता. कवी परदास्यापेक्षा सत्वाने वागण्यात मरण पसंत करतो जो सर्वांभूती आत्मभाव ठेवतो त्याचेच नाव मेल्यापाठी शिल्लक उरते असे कवीचे मत आहे. सजि-वांना काय कमी आहे म्हणून लोक खापरांची पूजा करतात ? असा त्यांचा प्रश्न आहे. "साऱ्या सुखा जी जोड । ईश्वर मजनी आवड " त्याकरिता अंतरात असलेला गुप्त वन्ही तेवढा चेतला पाहिजे.

'गुप्त वन्ही जो अंतरी ।
फुऱ्या त्याची सत्ता भारी ॥१०॥

"आदिशक्ती जी चित्कला ।
फुऱ्या तिने जागा केला ॥

आणि यातून त्याला जो जो अनुभव येत गेला तोची भाषणा विषय होत गेला. खळ संता शिव्या देती. यांना आयुष्यात बरेच कटू अनुभव आले परंतु सर्वांगी संदर असलेला फुऱ्या धैर्याचा बळकट होता. त्यामुळे 'फुऱ्या खऱ्या खोटया न भी' असे सांगताना आढळतो. कोणी कोणाचा सांगाती नाही त्यामुळे रागव्देषाने तापून शांतीशी मापणे व्यर्थ आहे. त्यापेक्षा 'वोला तुकोबाची भाषा । फुऱ्या भद्र दाही दिशा " ॥ मृत्युसमयी फुरसत-लाल बरेच वृद्ध होते. यांच्या मुत्सद्दीपणाच्या या भागात बऱ्याच गोष्टी ऐकावयास मिळतात. (सदहूं लेखकाने या पूर्वी 'नवेजग' (यवतमाळ. दि १७-१-५४) मधून लिहिले आहे.)

'स्फुट फाल्गुनीतोसा' – तथा इतर रचना वरीच आहे. त्यात काही मराठी व हिंदी पदे आहेत. रचना मराठी, हिंदी व उर्दूत असून ती मराठी, मोडी व उर्दूत लिहिली आहे. शाई फुटल्यामुळे मोडीतील रचना पूर्ण वाचता आली नाही व फार्सीचा जाणकार न मिळाल्या-मुळे उर्दु रचना वाचल्या गेली नाही. फुरसतलालच्या काही वह्या यवतमाळचे **श्री. द. बा. महाजन ॲडव्होकेट** यांच्याकडे **'शारदाश्रमात'** ठेवायास दिल्या आहेत.

इतिशम्

(नामानिराळे केशवसुत आणि ओघावेगळे मुक्तिबोध या प्रदीर्घ निबंधाचा उत्तरार्ध)

ओघावेगळे मुक्तिबोध

मनोहर आपोनारायण

पाश्चात्य इंग्रजी राजवटीबरोबरच पुरोगामी, व्यक्तिवादी आणि वैचारिक वाङ्मयाचा जो एक ओघ आपल्याकडे आला त्यात आधुनिक नवीन म्हणविल्या जाणाऱ्या कवितेचे उद्गाते केशवसुत सर्वप्रथम यथेच्छ न्हाऊन निघाले. अनुकरण, अनुसरण, अनुकंपन, अनुवाद, इत्यादी अनुभवाभिव्यक्तींची नवी नवी वस्त्रे लेऊन केशवसुतांच्या कवितेपासून मराठी कवीच्या जाणिवेची आणि म्हणून काव्याची दशा आणि दिशा बदलली. कल्पनांचे देशान्तर आणि आपल्या अनुभवाभिव्यक्तीचे वेषान्तर असे तिचे अंतर्बाह्य बदललेले स्वरुप दिसते.

पुढील कवींपैकी गोविन्दाग्रजांनी जरी स्वतःला 'केशवसुतांचा सच्चा चेला' म्हणवून घेतले तरी त्यांच्या प्रेमकवितेनेच रोमॅन्टिक म्हणविल्या जाणाऱ्या या (प्रेम) संप्रदायाचे प्रतिनिधित्व केले.

बी सौन्दर्यवाद व टिळक तत्वज्ञानाच्या काव्य, विषयक जाणीवांच्या बंधनात अडकुन पडल्यामुळे त्यांची कविता या केशवसुती ओघातुन फुटुन निघाली, असे म्हणण्या ऐवजी तो एक आपले वेगळेच अस्तित्व प्रकट करणारा निर्झर होता असे म्हणणे जास्त बरे.

मर्ढेकरांच्या वैयक्तिक जाणीवा तुच्छतामूलक, निराश; तरीही त्यांच्या मानवतावादी कवितेने मराठी काव्याची आणखी एकदा दशा आणि दिशा बदलली, त्यामुळे आधुनिक मराठी काव्याची अनेक अंगे–अुपांगे आपल्या नजरेत येऊ शकलीत. मर्ढेकर हे दुसरे केशवसुत ठरले.'*

केशवसुती अनुकरण, अनुसरण, अनुकंपन अनुवादादी अभिनव अनुभवाभिव्यक्तीच्या मोहापासुन मुक्तिबोध मात्र जसे मुक्त राहिलेले दिसतात, तसेच वरील सर्वांपेक्षा त्यांच्या जाणीवेचा मूलस्त्रोतही अभिनवउन्मुक्त स्वच्छंदी (Romantic) असुन देखील – अगदीच आगळा–वेगळा आहे. संप्रदायीन, ओघात सांपडलेल्या कवीपेक्षा मुक्तिबोध वेगळे आहेत. नव्या जाणीवांचा जसा त्यांना शोध लागला तसाच त्यांच्या अुत्कट तलस्पर्शी आत्मानुभुतीच्या अभिव्यक्तीच्या अभिसाराचा आगळाच बोधही झाला, आणि मुक्तिबोध ओघावेगळे होवुन आपली नवी मळवाट चालु लागले. त्यामुळे 'नवी मळवाट' अभ्यासिल्यानंतर मला जे काही वाटले, मला जे काही अनुभवाला आले तेच केवळ प्रामाणिकपणे समोर मांडीत आहे.

आधुनिक नवकाव्याचे निकष मुक्तिबोधांच्या काव्यास लावल्यास आजच्या नवकवितेची वैशिष्टये प्रथम पहावयास लागतील.

(अ) आजच्या काव्याचे पहिले आणि प्रमुख वैशिष्टय म्हणजे ते प्रयोगवादी आहे हे होय, असे सांगितले जाते. ह्यूगो, म्यूसे, वगैरे रोमॅन्टिक कवींच्या काव्यानंतर बॉदलेरार पासुन फ्रेंच काव्यातील देखावा बदलुन जाऊन एकोणविसाव्या शतकात एका आगळयाच दुधारी–व्यक्तिवादी धारदार जाणीवेचे वेगळेच काव्यविश्व जसे फ्रेंच काव्यांत उदयाला आले, स्वतःच्या प्रवृतीवर व संवेदनावर विश्वास ठेवून जीवनशोधातुनच ज्यांचे काव्य जन्माला आले, आणि ज्यांच्या कलातत्वांचा स्वीकार ज्या रॉसेटी, वाइल्ड, पेटर आदी इंग्रजी काव्यकलावंतांनी केला, तसेच एक काव्यविश्व फ्रेंच या कवींची कलाविषयक तत्वे आधारभूत घेऊन व महत्वाची ठरुन मराठी काव्यात एका नव्यानेच उघडलेल्या प्रयोगशाळेत निर्माण झालेले दिसेल.

(ब) सामाजिक, राजकीय, अर्थिक, आणि सांस्कृतिक वैषम्य पीडित विसंगत जीवनाच्या जीवघेण्या जाणीवेतून, शारीर–मानस अनुभूतींना वर्जनारहित

* प्रा. गाडगीळ, गंगाधर, 'मर्ढेकर; दुसरे केशवसुत' (खडक आणि पाणी)

(Inhibitionless) असे मध्यवर्ती स्थान देऊन, स्वतःच्या अत्यंत विशिष्ट व पृथगात्म अनुभुतीतून जीवनसत्तेला (Existence) स्पर्श करून स्वसंवेदनेतुन जीवनाच्या सारसत्याचा (Essence) प्रत्यक्षानुभव देण्यास्तव गूढवादी कवीची भूमिका घेऊन प्रतीक वादी (Symbolic) काव्य निर्माण होण्याचाच हा काळ होता. त्यामुळे शब्दांच्या संवेदक व उद्दीपक व्यापारातुन तो विलक्षण रहस्यात्मक अनुभव साकार करण्यास्तव शब्दांचे आणि त्यांनी व्यक्त होणाऱ्या अस्फुट, अनामिक, तरल संवेदनांचे जाणीव पूर्वक अन्योन्यीकरण करुन त्यांच्या द्वारा एक प्रतीक रुप विलक्षण, आणि वस्तुपर आकृतिबंध-प्रतिमाबंध निर्माण करण्यांत रिंबोने आपले अेक वेगळेच काव्यविश्व आणि विश्वकाव्य सिद्ध करण्याचा प्रयत्न केला तर रिंबोच्या अगदी विरूद्ध टोकाला जावुन नादरंगात्मक ताळमेळातुन, शब्दसंबोधामधून, पानावरील मोकळ्या जागेवर एकशब्दविश्व (One word's world) उभारुन एक विलक्षण अभिव्यक्ति विलक्षणता मेलार्मेने आपल्या काव्यांत प्रयोगशील केली. काव्यभाषेचा एक स्वतंत्र आणि स्व-तंत्र भाषास्वर्गच (paradise of Language) त्याने निर्माण केला. आणि फ्रेंच काव्यसृष्टिचा तो बादशाह ठरला. त्यापुढील पौंड, एलियट, हॉपकिन्स यांच्या जाणीवांचे क्षेत्र मात्र मध्यमवर्गीय जीवनाच्या ऱ्हासाने विकारीत झालेले दिसते. मर्ढेकर, पु. शि. रेगे, विन्दा करन्दीकर, दिलीप चित्रे, ग्रेस, अरुण कोल्हटकर, इतकेच कशाला अगदी आताआताचे प्रभाकर शिरास, वसंत आबाजी डहाके आदी कवि प्रयोगवादी म्हणून नावाजलेले (कांही वाजलेले) आहेत.

मराठी काव्य हे प्रयोगवादी असे आजच आहे असे नसून केशवसुतांनी प्रथम अशी एक प्रयोग शाळा काढली. आशय-विषय, अभिव्यक्ती यांचे अनेक प्रयोग प्रयोगवादी पाश्चात्य कवींच्या प्रयोगशाळेतली अनेक रसायने जमवुन त्यांनी केले. केशवसुत निघून गेले आणि कांही काळ ही प्रयोगशाळा रिकामी राहिली. मर्ढेकरांनी ती पुन्हा उघडली आणि केशवसुतांना जमले नव्हते-नसते असे अनेक अर्धवट राहिलेले आश्चर्यकारक प्रयोग त्यांनी वेगळ्या रितीने करून दाखविले. आणि स्वतःचे वेगळे अस्तित्व अबाधित राखले.

(क) आजच्या काव्याचे आणखी एक महत्वाचे वैशिष्टय सांगितले जाते ते म्हणजे प्रतिमाप्रधानता, मर्ढेकरांच्या कविता नव्या प्रतिमामुळेंच विशेष गाजल्या. पुढच्या कवीता प्रतिमांचे प्रतीकांत रुपांतर झाले. परंतु हीच गोष्ट केशवसुतांच्याच काव्यांत प्रथमतः आली. उदा. चिन्हीकरण अर्थात भाव आणि मुर्ती यांचे लग्न, मूर्तीमंजन किंवा तुतारी. अर्थात आजच्या कवी प्रमाणेच आपल्या प्रतिमा-प्रतीकांतुन सुक्ष्म जीवन सत्यावर प्रकाश टाकण्याची तात्विक भूमिका त्यांनी कवीच स्वीकारली नाही आणि म्हणुनच आजच्या कवितेचा तिसरा महत्वाचा विशेष म्हणजेंच अमुर्तता (Abstract) हा केशवसुती परंपरेतुन आला आहेसे मला वाटते. प्रत्यक्ष जीवन दर्शनात्मक व जीवन संदर्भमुलक आणि अपुरी प्रतीकवादी अशीच काव्यपरंपरा दुर्दैवाने मराठी कवीतेच्या वाटयाला आली. याचे कारण अनुसरण, अनुकंपन, अनुसरण किंवा अनुवादन काहीही असो परंतु ती पुष्कळशी अनेकलक्षी आणि अनेकअर्थी अशी मात्र खासच आहे. म्हणुनच केशवसुतांना 'नामानिराळे' म्हणायचे.

(ड) आजच्या काव्याचा चौथा महत्वाचा विशेष म्हणजे ते सौन्दर्यवादी आहे हे होय. केशवसुतांच्या सौन्दर्यवादाचे रहस्य त्यांच्या उत्कट स्वातंत्र्योन्मुख व्यक्तित्वांत व चैतन्यतत्वाशी एकरुप होवु पाहणाऱ्या त्यांच्या आदर्शवादांत आहे असे मानले तरी मग त्याचा प्रत्यय कवीच्या प्रत्याभिज्ञतेत येत नाही. त्या दृष्टीने केशवसुतांची कविता रोमॅन्टिक म्हणजे सौन्दर्यवादी या अर्थानें म्हणावयाचे झाल्यास या कवितेत सौन्दर्यवादाचे कोणते घटक घनीभुन झालेले दिसतात ? रोमॅन्टिक या शब्दबंधाचा अर्थ मी याचमुळे 'उन्मुक्त स्वच्छन्दी' असा करतो व परिणत प्रणय प्रणित व जीवनात पीडित रसतत्वाचे संवेदना, प्रतिमा, प्रतिके, आणि मुख्य म्हणजे ह्या सगळ्या वृत्तींना जागृत करणारे असे प्रेमरसाचे मानवतावादी अधिष्ठान हे त्याचे मुख्य लक्षण मानतो. प्रेम या शब्दांचा विपरित अर्थ मात्र विनाकारण करुन घेवु नये. ती एक वृत्ती आहे. जशी ज्याची प्रकृती तशी त्याला अनुभूती. आणि व्यक्ति तितक्या प्रकृती आणि प्रवृत्ती म्हणून कृती-कलाकृती नि त्यांची अभिव्यक्ति असे हे माझे विवेचनाचे स्वरुप आहे. केशवसुतांच्या प्रयोगशील सौन्दर्यवादी कवितेचे मूळ हे या प्रमाणे त्यांच्या व्यक्तिमत्वातच शोधणे जितके रास्त तितकेंच तिचे कुळ पाश्चात जीवन पीडित काव्य प्रणालीचे शुद्ध रसपान करण्याच्या प्रेम प्रवृत्तीतच आहेसे

दिसेल. मी रेखाटलेले 'नामानिराळे केशवसुत' वाचक पाहतील तर याची प्रचिति घडेल. परंतु गडकरी, टिळक आणि बी प्रमाणेच केशवसुतांच्या क्रांतीच्या ओघांत वाहुन न जाता आपल्या अनोख्या काव्यविश्वात जीवनाच्या ऐतिहासिक व्यापारांची प्रतिती घेत, जीवन संघर्षांशी समरस होवु पाहणारे, मध्यमवर्गाचेच व मध्यम वर्गीय जीवनाचा व मनाचा ठसा असलेले, युग समस्येच्या बाबातीत धारण केलेल्या नैतिक वृत्तीचे, मुक्तिबोध मात्र ओघावेगळे असे आहेत.

(२) मुक्तिबोधांची मळवाट म्हणजे काव्यध्येय आणि ध्येयकाव्य एका आदरणीय आदर्शाच्या आशय–विषय आणि अनुभुतींच्या अभिव्यक्तीच्या संदर्भात नवीन आहे. (याच आदर्शवादाच्या आवर्तात केशवसुत स्वतःचे जीवनविषयक श्रेय हरवुन बसले.) याचे कारण त्यांची विलक्षण आत्मनिष्ठा. ती तशीच शेवटपर्यंत आत्मकेन्द्री राहिली असती तर कदाचित केशवसुतांना नुसत्या श्रेयासाठी झुरत पडावे लागले असते. परंतु व्यक्तिगत जीवनादर्शाला मानवता-समाजवादाची आणि आदर्शवादाची चौकट लावण्याचा प्रयत्न त्यांनी केला आणि स्वतः नामानिराळे झाले. मुक्तिबोधांची जाणीव आत्मनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ असूनही जीवननिष्ठ आहे. जाणीव जीवननिष्ठ आहे याचा अर्थ त्यांची जीवनावरील निष्ठा आहे आणि आपल्या वाट्याला आलेले जीवन ते निष्ठा पूर्वक जगु इच्छितात. तरीही या निष्ठा आणि आदर्श टिकविण्याच्या संदर्भात जेव्हा ते व्यक्तिगत जीवना कडुन समाजजीवनाकडे पाहतात तेव्हा अेक संघर्ष त्यांच्या नजरेला पडतो. हा संघर्ष मध्यमवर्गीय जीवनाचा जीवन जगण्यास्तव सघर्ष असून (struggle for survival) त्यांत व्यक्तींची व्यक्ती म्हणुन जगण्याची आदर्शवादी कल्पना आणि जीवन विषयक सौदर्यभावना या संपूर्णपणे उध्वस्त झालेल्या त्यांना दिसतात आणि एका वेगळ्याच जाणिवेचा त्यांचा त्यांनाच साक्षात्कार होतो ही जाणीव–हा साक्षात्कार त्यांना आपल्या आंतर्विश्वातील मृदु–मधु प्रीती कोषात असतांनाही कळत न कळत झालेलाच होता. परंतु त्यांचे सामाजिकीकरण मात्र समाज जीवनांत, कधी कधी अशा अगतिक-असहाय समाजजीवनाच्या आदर्शीकरणांत आणि आदर्शीकरणाच्या 'स्वप्नस्थ वास्तवात' होत असतांना कांही पूर्वानुभवांची खंतही (Nostalsia) दिसते. ती खंत भावकाव्यात्मक कांही कवितातून दिसल्यामुळेच सौदर्य शास्त्राचे परिणाम लावून मुक्तिबोधांच्या काव्याला डॉ. द. भि. कुळकर्णी 'भावकाव्य आणि विलक्षण अंतर्मुख भावकाव्य' किंवा आत्मसंघर्षानुभुतिमुळे होणाऱ्या एका भावोत्कट भावगंभीर व्यक्तित्वाचा भावकाव्यात्मक आविष्कार"* म्हणत असतील तर मग वस्तुनिष्ठ जीवनसत्याचा किंवा या जीवनसत्याच्या कलात्मक अविष्कारांचा संबंध सौन्दर्यशास्त्र दृष्टचा किंवा मानसशास्त्र दृष्टचा केवळ कुण्या एका भावूक व्यक्तीशी, व्यक्तित्वाशी किंवा क्षणिक भावोत्कटतेशी लावून मोकळे होता येत नाही तर तो संबंध आणि त्यामुळे निर्माण होणारा जीवन संघर्ष जीवनाच्या संदर्भात समाज जीवनाशी ती व्यक्ति समाजाचा अेक अविभाज्य घटक या नात्याने, मग ती कितीही आत्मकेंद्री किंवा एकात्म असो, लावण्यातच या भावकाव्यात्म म्हणविल्या जाणाऱ्या वृत्तींच्या शोधांत उपयोगी पडतो. डॉ.ना. हे मान्यही असावे. ते म्हणतात; 'प्रणय मुग्धता-आत्ममुग्धता–आत्मनिर्भत्सना–आत्मविश्वास या क्रमाने मुक्तिबोधांचा आत्मशोध झाला असावा असे मानता येईल'— 'मानवाच्या विजययात्रेत सामील होण्यास कवी कवीचा उत्सुक होता. त्या यात्रेतील स्थान आता कवीस सापडले आहे— जीवनाच्या मुलस्त्रोताशी असलेला आपला आंतरसंबंध कवीला प्रतीत होतो. त्या साक्षात्काराचे दर्शन म्हणजे 'नवी मळवाट' ही कविता-- **

मुक्तिबोध भावुक असतील (म्हणून तर आदर्श मानवतावादी ठरेलत) परंतु त्यांचा पिंड मात्र एका कठोर जीवनसत्याचा आविष्कार घडविणाऱ्या द्रष्टयाचाच आहे.

वास्तविक मुक्तिबोध स्वतःच आलेल्या या आदर्शवादी अपयशाची प्रामाणिकपणे कबुली देतात. खरे म्हणजे, आशावादी काव्य परंपरा कल्पिण्याचे कारण वेगळेच होते. स्वातंत्र्योत्तर काळातील संक्रमणावस्थेत आजवर अप्रकट राहिलेल्या सर्व विसंगति डोके वर काढतील व मानवी स्वातंत्र्याचा व समतेचा संघर्ष भारतात सर्वव्यापी बनुन समाजवादी निष्ठा ही कवींच्या प्रत्यक्ष प्रचीतीची व त्यांच्या समग्र व्यक्तित्वाला नैतिक

* डॉ. कुळकर्णी, द. भि. 'मुक्तिबोधांची कविता, सत्यकथा, मे १९६७

** किन्ता, पृष्ठ, ३०–३१.

आव्हान देणारी जाणिव ठरेल, असा माझा विश्वास होता. हे भविष्य चुकले, व भारतीय समाजाने नव्या वळणाने वाटचाल केली. हा माझ्या विचारसरणीचा दोप होता असे मला अजूनही वाटत नाही. दोप असेल तर तो अपुऱ्या निरिक्षणाचा व जाणीवेचा होता असेच म्हटले पाहिजे.*

आशावादी परंपरेचा विचार पुस्तकातच राहिला किंवा हा अपुऱ्या निरिक्षणाचा व जाणिवेचा दोप होता असा कबुली जबाब मुक्तिबोधांनी दिला तो त्यांचा मोठेपणा. परंतु या कबुली जबाबाचा मुख्यार्थ असा की, पुढे यांत्रिक मधुन त्यांनी जे जीवन दर्शन घडविले तेच 'नवी मळवाट' कवितासंग्रहातील कांही कविता लिहितांनाही त्याना पूर्वीच घडले होते. केवळ अभिव्यक्तीचा प्रकार मात्र वेगळा होता. जाणिवही होती परंतु उणिव होती ती नेमक्या अभिव्यक्तीच्या घाटाची, नि थाटाची. त्यांना वाटले तो अभिव्यक्तीचा घाट नि थाट आपल्या अंतःकरणातील फुलांमधील ज्वालांचे दर्शन घडविण्यात पुरेसा होईल. तसे वाटणे अस्वाभाविक नव्हते. अप्रयोजक ठरले असेल. परंतु म्हणुन या अभिव्यक्ती प्रकारामुळे त्यांच्या व्यक्तित्वाचा कांही लोप होणे शक्य नव्हतेच. गुलाबाच्या फुलाच्या रक्षणासाठी काटे असतात. मुक्तिबोधांच्या जाणिवेतील विखार आहे यापेक्षा अधिक तिव्र झाला असता तर त्याने सौन्दर्यवादी म्हणविल्या जाणाऱ्या एका काव्यपरंपरेलाच भस्मसात करुन टाकले असते. किंवा मग अुगीच कुणाला त्यांत कृत्रीमता वाटली असती.

शालेय जीवनापासूनच केशवसुतादि कवींचा परिचय झालेला होता. हिन्दीतील पंत, प्रसाद, निराला, यांच्याहि काव्याचा व त्यातील स्वप्नात्मक गूढ आदर्शवादाचा मनावर परिणाम होताच — संस्थांनी वातावरण व धार्मिक संस्कार; तशीच मनोभूमिका परिपुष्ट होईल अशी भोवतालची रमणीय सृष्टी, व्यवहाराच्या धकाधकीचा संबंधच येवू नये अशी परिस्थिति. महाविद्यालयीन जीवनांत अभ्यास सोडुन सांपडेल त्या विषयावर (न समजता) केलेले मनसोक्त वाचन, रोमॅन्टिक इंग्रजी कवी व रविन्द्रनाथ यांच्या काव्याचे संस्कार, वाचनातून रोलांचे व प्रत्यक्ष वातावरणातुन गांधीचे अनुभवलेले अस्तित्व इत्यादि—या सर्वांचा विभिन्न परिणाम होण्या-ऐवजी मानवतावादाचा एकच उत्कट प्रत्यय राहते. शहर-मजूर चळवळीचे केन्द्रं. सर्वत्र दिसणारे जीवन-वैपम्य, मार्क्सवादाने एक ऐतिहासिक वस्तुनिष्ठ दृष्टी दिली. हा मानवतावाद प्रत्यक्ष व्यवहारांत आणाव-याचा तर त्यासाठी निव्वळ वैयक्तिक श्रेष्ठत्व, निव्वळ त्याग, निव्वळ धार्मिकता हे अखेरीस उपयोगी पडणारे नाही, किंवा मानवतेवर नुसते प्रेम करुनही ती अखेरीस सुखी होणार नाही. तेव्हा मानवी जीवन परिवर्तन आवश्यक आहे. आणि ते शास्त्र-शस्त्र म्हणजे समाजवाद. समाजाधिष्ठीत समाजसत्तावादाचे मार्क्सने सांगितलेले सिद्धान्त प्रत्यक्षांत उतरल्यास मानवी सुखाची स्वप्ने साकार होतील.*

* प्रा. मुक्तिबोध, शरच्चन्द्र, 'नवी मळवाट' प्रस्तावना पृष्ठ दहा.

जीवनविषयक हा दृष्टीकोन स्पष्ट झाल्याबरोबर कलावंत या नात्याने मुक्तिबोधांचे आपले काव्य विषयक दृष्टीकोनही बदलले असतील तर नवल नाही. कारण "कलावंतांचा संबंध जीवनाच्या सुखदुःखाशी असतो. तो जसा संकुचित जाणीवांचा असू शकणार नाही, तसाच तो प्रणालिपीडित वा प्रणालिसीमितहि असु शकणार नाही. उलट, कलावंताची साक्ष विचार प्रणालीनाहि मोलाची व महत्वाची मानावी लागेल." याच जाणीवांच्या साक्षात्कारातुन प्रथम मुक्तिबोध कविता लिहुन गेले आणि त्यांचे 'भविष्याच्या गर्भातल्या बाळाचे रुदन' अधिक वास्तवकारी ठरले. पंच प्राणांनी मांडलेल्या आकांताने त्यांनी स्वतःच स्वतःला त्यावेळी 'सशक्त व्हा, पाय रोवा, उद्याचीच आण पालटते कुणी विश्व इतिहास पान' असे समजाविले होते.

हुश्शार रे । जन्म घेतें कांहींसे नवीन
प्रचंडशी जनशक्ती जिके या मधुन
आयका ! या संघर्षाच्या गदारोळातुन
भविष्याच्या गर्भातल्या बाळाचे रुदन.

प्रत्यक्षांत क्रांती करणे वेगळे आणि क्रांतीकारक विचार कागदावर लिहून क्रांतीकारकत्व मिळविणे वेगळे, केशवसुतांच्या काव्यातली क्रांती कोणती ? काव्यविषयक की समाजविषयक ? मला वाटतं:सामाजिक क्रांतीत प्रत्यक्षपणे भाग घेण्याची इच्छा असुनही परिस्थितीने आणि तदवृतीने ते न जमण्याचीच खंत केशवसुतात जशी दिसते तशीच ती मुक्तिबोधातही दिसते. केशव-

* प्रा. मुक्तिबोध, शरच्चन्द्र, 'नवी मळवाट' प्रस्तावना पृष्ठ एकतीस.

सुतांनी ही खंत काव्यविषयक संदर्भात प्रकट करण्याचा प्रयत्न केला. आणि केशवसुत नामानिराळे राहिले. दुर्दैवाने त्यांचे हे मूळस्वरुप कोणाला गवसले नाही. राजकीय, सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्य-बंधुता-समता या तत्वप्रणालींच्या रक्षणार्थ या प्रमाणे कागदी वावड्या उडवण्यांत जरी अर्थ नसतो तरी अशा प्रक्षोभाच्या संघर्षाच्या क्षणाला (crisis) शब्दच शस्त्र होतात. "केवळ पुस्तकी क्रांतीचे आम्ही

यांत्रिक गीतांचे कागदी कवी
मयस्थ राहुन दुरुन तोषूं
रचुन कविता महाविप्लवी
वंचित जीवननंदाच्या प्रचंड
गतीच्या जाणीवे पासुन आम्ही
बंचित मानवी संघर्षाचिया त्या
महान विश्वासापासुन आम्ही"

कवीच्या उरींही आशेचा संचार ही गंभीर झडणारी गगनदुंदुभि ऐकून होतो. तुतारीतील आणून देवुन ती फुंकण्याची भाषा येथे नाही. उद्‌बोधनाचे कवचही नाही. क्रांतीकारकाचे बीज आहे. परंतु क्रांतीकारकत्व मिळविण्याचा निस्तेज आवेशही नाही. तर 'पिअुनिया पोळली जी नवे तुषार' अशा अमर्याद यातनांची डहाळी असुन तिला लागलेले हे प्रक्षोभाचे रक्त फूल आहे. 'दाह पोंचला पराकोटीला' 'वक्ष भेदुनी छन्द निघाले' असा या जीवन काव्य निर्मितीचा अनुभव आहे. अर्थशून्य नसुन तो अर्थगर्भ आहे. तो एक 'जीवाची प्रचंड फेक' आहे. उसळला प्राणदर्या आटोपेना, आटोपेना असेच तिचे जगड्व्याळ स्वरुप आहे.

"समष्टीचे रक्त तुझ्या धमन्यांत प्रवाहित।
समष्टीच्या चैतन्याने तुझे प्राणप्रकाशित"

अशी पूर्णपणे जाणीव असुनही मोक्तिबोधांना एक खंत (Nostalsia) कां वाटावी तेच कळत नाही. मानवीजीवनविषयक दुःखाच्या तीव्र जाणिवेतुन तर ही खंत स्मृतिजन्य होवुन व्यक्त होत नसावी ? Disassociation असेच तिचे स्वरुप असावे.

मानवी दुःखाची जबाबदारी मर्ढेकर मानवी मनावरच टाकतात. तर मुक्तिबोध ही अगतिकता नैराश्य, निराशयता, अ-मानवता राजकीय, आर्थिक आणि सामाजिक असंतुलनाचे—वैषम्याचे परिणाम मानतात. जीवनाची क्षणिकता मर्ढेकरांना मानवी मनाच्या आणि जीवन जगण्याच्या त्याच्यात क्षीण अनुकंपेत दिसते तर मुक्तिबोधांना ती पाशवी सत्तेत दिसते. मर्ढेकरांची प्रतिमा ही बहुगेडी आहे पण बहुपिंडी नाही.*

मानवी मनाचे पापुद्रे ते उकलुन दाखवितात परंतु एकाच प्रकारच्या मनःस्थितीच्या पातळीवरुन ते ते उकलतात. त्यामुळे मर्ढेकरांच्या व्यक्तित्वाचा शोध करंदीकरांना एकपिंडीत्वात लागत असावा. मुक्तिबोधांना ही संज्ञा मध्यम वर्गांतील व्यक्तिवादी संघर्षातून मिळते. या वर्गातील व्यक्तिच्या सृजनशीलतेविषयी त्यांना जबरदस्त आत्मविश्वासही आहे. वैयक्तिक निराशेची छाया ही त्यांच्या काव्यजीवनांत सारखी वावरत असली तरी ती केवळ क्षणिक, तत्कालिन असून आशावादी सोनेरी स्वप्ने तिच्या उदरांत जन्म घेणारे आहेत. वस्तुनिष्ठ सत्याची कलात्मक जाणीव जशी मर्ढेकरांना आहे तसेच सत्य मुक्तिबोधांनाही जाणवते. व्यक्तिच्या सृजनशिलतेचा विकास तद्‌नुकूल परिस्थिती असल्यास होईल. मध्यम वर्गीय जीवनातील सर्वांगिण विकासाचे मूळ बहुजन समाजातील संघटनेत—सामर्थ्यात चैतन्यात आहे. व्यक्तिमनाची, समाजाची, निसर्गाची अंतिम जीवन मूल्याची व सत्याची एकरूपता मुक्तिबोधांना अपेक्षित आहे. अभिप्रेत आहे. समाजवादी मानवतावादी विचार प्रणालीवर आधारलेली ही जीवननिष्ठा आहे. आणि त्याच जीवननिष्ठेवर पोहोचलेली मुक्तिबोधांची नवी मळवाट आहे.

नवकाव्याचे किंवा रोमॅन्टिक काव्याचे मुख्य वैशिष्टच नव्या जाणीवा आणि नव्या भावना यांचे समाजव्यापी मानवतावादी रसायन आहे, असे मानल्यास या रसायनाचा परिणाम रसिक मनावर तीव्रतेने घडविण्या इतपत मुक्तिबोधांचे प्रमेय सिद्ध होण्यास हरकत नाही. वास्तविक रोमॅन्टिक कवी व्यक्तिनिष्ठ किंवा आत्मनिष्ठ असतो. वस्तुनिष्ठेचा त्याच्या दृष्टीतच अभाव असतो. केशवसुतात आत्मनिष्ठा जास्त व वस्तुनिष्ठ मुळीच आढळत नाही तर मर्ढेकरांत वस्तुनिष्ठ सत्याची कलात्मक जाणीव तीव्रतर आहे. मुक्तिबोध आत्मनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ असूनही जीवननिष्ठ आहेत. रोमॅन्टिक कवीच्या काव्यप्रेरणेचा एक केन्द्र

---

* करंदीकर, गो. वि., मौज दिवाळी अंक, १९६५ 'मर्ढेकरांची कविता : एक मूल्यमापन'.

बिंदू म्हणून व्यक्तिमन आहे असे प्रा. दि. के. बेडेकर मानतात* प्रा. वा. ल. कुळकर्णी यांच्या मतें कवीतेचे मुल्यमापन हे कवितेच्याच व्यक्तित्वातून व्हावे असे असून रा श्री. जोग मात्र या जीवन दृष्टीला कलावंताच्या दृष्टीकोनातून पाहण्याचा प्रयत्न करतात.** मला वाटते : कुठल्याही वाङमयीन कलाकृतीचे कलामूल्य या प्रमाणे केवळ त्या कलाकृतीच्या बाह्य आकार प्रकारावरून किंवा कलावंताच्या सौन्दर्यवादी भूमिकेतून पाहून ठरविणे इष्ट ठरणार नसून कलावंताच्या जीवन-विषयक सजाणतेचे किंवा अजाणतेचे वस्तुनिष्ठ सत्याचे कलात्मक पुरावे तपासून घेवून व्हायला हवे. शेवटी कलावंताचे व्यक्तीमन आणि सामान्याची जाणीव मर्यादा यांचेही काही परिणाम संभाव्य आहेत की नाही ? ते असामान्य स्वरूपाचे असू शकतील. किंवा सामान्यांचे प्रतिनिधित्व करू शकणारेहि असतील.

मुक्तिबोधांच्या कवितांचे या प्रमाणे मूल्यमापन केल्यास सौन्दर्यवादाचे डोहाळे पुरविण्यास ही कविता असमर्थ ठरेल तरी वास्तवतेचे मात्र तिचे जवळचे नाते सांगता येईल. ही वास्तवता मुक्तिबोधांच्या कवितेतून आत्मविष्काराच्या रूपाने बाहेर पडते आणि एका 'त्रिशंकूचे स्वप्न' सांगून त्याला सगळे ओळखी पल्याड झाल्याचे वाटत असल्याची खंत प्रकट करते. परंतु तीच वास्तवता 'तेच हे रक्त । ज्याचिया कारणे आरक्त पाने ती फोडून डहाळचा बाहेर येतात, असे पिंडगत व्यक्तिमत्वही उभे करून जाते. केशवसुतांच्या कवितेतील प्रेरणा व्यक्तिगत असूनही तिचा अविष्कार वेगळा, प्रेषक वेगळा, आणि प्रामाणिकतेच्या आविर्भावातला असंतोष वेगळा; मुक्तिबोधांच्या काव्यातला अभिनिवेश आत्मनिष्ठ असूनही त्याची प्रेरणा ते समाज जीवनातून घेऊन त्या प्रेरणेचे ते प्रतिनिधित्व करतात. 'माझ्या पीडेला अर्थ येईल' याचा त्यांना अभिमान आणि आत्मविश्वास आहे खचित ! "माझी पीडा धरेल तिच्या वक्षांत मूळ खोलात माझ्या पीडेला अर्थ येईल, लक्ष लक्ष त्या गीत फुलात" किंवा-

*प्रा. बेडेकर, दि. के. केशवसुतांची काव्यदृष्टी

**प्रा. जोग रा. श्री. मराठी कविता, १९४० ते १९६५.

" छंदांच्या लहरीवर लहरी
माझी प्रज्ञा झाली गहिरीं
लक्षावधि स्वप्नांच्या ज्वाळा
रोखु कसा मी अनल उमाळा "

किंवा– " उसळला वरती तेजोगोल
निमाले मान, कळाले मोल
विराले दिवा स्वप्न ते पार
गवसला चैतन्याचा हार " इत्यादी

किंवा या उलट : मानवा, मानवा, काय ही स्थिती
किडयांचे मरण, जिण्याची भीति
काय ही लाचारी । अलोट हे दुःख
जाळते जीवन मूक ही किती !

वैयक्तिक जीवन विरूद्ध सामाजिक, राजकीय आर्थिक जीवन यांच्या आदर्शीकरणांच्या प्रयत्नांमध्ये चाललेला हा कालसाक्षेप संघर्ष आहे, त्यामुळे या दड-पणाच्या विरूद्ध जनवादी प्रबल शक्तीशीही त्याचा संघर्ष अटळ ठरतो. आणि मग 'ढासळतांत ती घरे, साक्षात क्षमा, भूमी पेटते नखशिखांत ' अशा प्रकारचा जुन्याचा विध्वंस करणारा एक धागा तर दुसऱ्या बाजूला जीवनातील आत्यंतिक अभावामुळे परस्परां-जवळ परस्परांना बिलगून बसलेल्या पतिपत्नींच्या सांसारिक जीवनातील कांही क्षणांचे व त्या क्षणातील आशा–निराशेचे चित्र या मळवाटेवर दिसते. व्यापक जीवन रस्त्यापासून हे चित्र भिन्न नाही. यातनातून जीवन कंठित असतांना एका जीवनाकांक्षेचे उद्याच्या सुखी जीवनाचे रम्य चित्र पहात असलेल्या स्त्री पुरुषाचे प्रतिनिधी अशा प्रकारच्या दोन जाणीवांचे धागे पर-स्परांत मिसळुन 'अंत आहे तसा आरंभ आहे.' या आत्यंतिक अनुभवाचे वस्त्र विणल्या गेलेले आहे. क्षणांची भावातुरता आणि युगजाणिवेची आणि भावनेची संगती पहा : "खात्रीने उद्या 'चल' म्हणून तुला नेईन बोल-पटास । थोडी शिल्लक फळीवरच्या डब्यामध्ये असेल ग खास आज तू नीज माझ्यापाशीच–

जग निजले, जागतो आहे एकलाच मी
यातनांचिया तीव्र दाहाने चिरजागृत
मनुजवैरी व्यवस्थांचिया तीव्र घृणेने

यातना माझ्या झाल्या डोळस " कारण : यंत्र आहे मी, प्राणयांत्रिक, अगतिक बळी परिस्थीतीचा चोवीस

तास गुलाम आहे मानवनिर्मित महायंत्राचा" या मुळेच त्या महाभागाला कशानेशी झोप येईनाशी होते.

इंग्रजीत ज्याला Imagism म्हणतात त्याची कास धरून रोमॅन्टिक वृत्तीतील सर्वच कवींचा प्रवास चालतो. प्रतिभेचे कार्य कधीकधी द्वर्थी असते. अवास्तवाचे मूर्तीकरण आणि अज्ञेय वृत्तीचे पोषण, कुठल्याही अनुभूतीची स्पष्टता त्या अनुभूतीला वैश्विक अर्थ देवू शकत नाही, असा हा समज. वास्तविक वास्तवाला जी व्यापकता येते ती या समजामुळे कवीलाही माहित नसते. वास्तवाच्या वैश्विकी करण्याच्या process मध्ये आदर्शवादालाही डूब मिळते. आणि कधी कधी उगीचच अंगिकारलेल्या आशावादाला निराशा व्यापकतेने ग्रासते. कवी आणि मृत्यु संवाद तुम्ही आम्ही केवळ ऐकून घ्यायचा. प्रत्यक्षांत करायची वेळ आली तर मात्र प्रत्येक जणच दैवाच्या गोष्टी बोलायला लागतो. सॉक्रेटिसाने वैश्विक सत्याचा संलप्प सिद्धीसाठी विष पचविले. आणि रक्ताचे पाट वाहिले. क्रांतीच्या बालकांचा जन्म मुक्तिबोधांना रूधिराच्या लाल सडचातच झालेला दिसतो. 'एकही स्पर्श माझिया तनूत स्मृतीचा रोमांच ओतू ना शके, एकहि अर्थ माझिया मनांत अजस्त्र श्रद्धेस ओतू ना शके' अशा अश्रद्धेतूनच 'प्रकाशतत्वांचा मीच पुरावा जर, अंधाराच्या मागे सूर्य मनोहर असतील काय ? किंवा–

'नवे निर्झर सूर्य युगाचा जाणती पत्ता
जेथे केवळ प्रकाशाचीच निर्वेध सत्ता'

अशीही एक श्रद्धा मनांत मूळ धरून असतेच. क्षणाक्षणाला जीवन मूल्ये बदलत असल्याची जाणीव कवीला आहे. Evocative प्रतिमांच्या द्वारे जीवनाचा एक भेसुर रम्य साक्षात्कार त्यामुळे घडतो. दुःखाचा स्वीकार आणि आशेचा किरण यातुन आपले ओघावेगळेपण सिद्ध करतांना मुक्तिबोधांना कुठल्याही Ism ची गरज नसते.

तरीही "मुक्तिबोधांचे काव्य वाचून डोळ्यासमोर काळ्यापिवळ्या पट्ट्यांचे एक पटल उभे रहाते हे खरे आहे. वरवर हें पटल डोळ्याला अंधारी आणणारे असले तरी सूक्ष्मपणे पाहिल्यास कळेल की तो लाल रंग रक्ताचा, बंडाचा, क्रांतीचा, पिवळा रंग तेजाचा आणि आशा किरणांचा, उरलेल्या काळ्या पट्ट्यांत अंधार, सामाजिक दुःखे, दारिद्र्य, उपासमार, नीतिभ्रष्टता सारे दृग्गोचर होईल .. या अर्थाने त्यांचे काव्य दुर्बोध आहे. त्याची पार्श्वभूमी समजल्याखेरीज या सर्वातून कवीला काय म्हणायचे आहे, याचा निश्चित बोध होत नाही. त्याची पार्श्वभूमी समजल्याशिवाय प्रत्येक कल्पनेत जो एक व्यक्तिगत (Personal) आणि सामाजिक स्पर्श आहे (Social Sense) त्याची मर्यादा व्याप्ती, आवाका कळल्याशिवाय त्यांचे काव्य कळणार नाही, पिळवणुकीने त्यांच्या हृदयाला पडलेला पीळ दिसतो तेव्हाच त्यांच्या काव्यातली सुसंगती, शब्दांची धार उकळते. बीभत्स, भयानक रसांचा आविष्कार मनाला पडतो. तेव्हाच गडद काळा, पिवळा, लाल रंग त्यांच्या रेखा विंदुसहित उठावदारपणे डोळ्यांपुढे स्पष्ट होतो ... रुधिराच्या लाल सडचातच तळमळत पण नाशातून, पीडेतून नव्या मनूला आव्हान करणे, त्याचे स्वागत करणे, हा त्यांचा पिंड आहे. या जुन्या नव्या संक्रांतिकालात मानवी मनाच्या यातना दाखविणे, त्यांचे प्रतिनिधित्व करणे, त्यांचा उच्चार करणे त्यातून मुक्तता करण्यास आशावादाचा संदेश घेवून त्यासाठी झटणे हा त्यांचा अभिनिवेश आहे ... कवीचे मन पेटलेले आहे चोहोकडे जी आग लागलेली आहे त्याचे कारण काय, त्याचा विचार, त्यातून मुक्त होण्यासाठी त्यावरील उपायांचे चिंतन आणि तत्संबंधी कृतीचे मार्गदर्शन अशी ही नवकाव्यातील विचारांची मालिका आहे असे ते म्हणतात. तेव्हा ते आत्मनेपदी बोलत असावेत असे वाटते. त्यातून कोणी आशावादी तर कोणी निराशावादी दृष्टीकोन पुढे मांडतो. स्वतः मुक्तिबोधांना उदात्त ध्येयाचा चुराडा (राजकीय, सामाजिक, आर्थिक, आणि नैतिक पातळीवर) जाणवला, जीवनातील उणीव स्वप्नभंग जाणवला त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर जुन्या आस्था व नवी विद्रुपता यांच्या संघर्षातून निर्वाणीचे क्षण (crisis) निर्माण होत आहेत. त्यांच्याही मनात हाच प्रक्षोभ अवतरला. काव्यरुपाने त्याचा स्फोट झाला. हे त्यांच्या 'नवी कविता, भविष्यातल्या गर्भातल्या बाळाचे रूदन, माझ्या पिडेला अर्थ येईल, लाल कंदील, रूधिराच्या लाल सडचातच, असेच आहे कांही, अंत आहे तसा आरंभ आहे, छंदाच्या लहरीवर लहरी, इत्यादी काव्यातून स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेले दिसते."* लोकमान्य टिळकांच्या स्वातंत्र्य प्रतिज्ञेतून ज्या प्रेरणा तत्कालिन महाराष्ट्रीय समाजाला किंवा कुठल्याही

* सौ. टिळक, मुमित्रा, ' नवी मळवाट ' पुस्तक परिक्षण, युगवाणी, एप्रिल १९६६.

स्वातंत्र्येच्छुक व्यक्ती–राष्ट्राला मिळू शकल्या त्यांच्या नष्टःप्राय अस्तित्वाचे अंधुक दर्शन केशवसुतांच्या काव्यात घडते. त्याचेच विलक्षण विद्राहक आविष्करण मुक्तिबोधाच्या काव्यात सामाजिक व्यक्तीमनाच्या संदर्भात सौ. सुमित्राबाईंना जाणवले असेल तसेच ते मलाही स्पर्शून गेलेच.

प्रत्यक्ष भेटीतल्या एका घरगुती चर्चेत मुक्तिबोधांची सौ. सुमित्रा टिळकांचे विचार परिक्षण मी मनानेच ताडून पाहिलेत. ते बरेचसे खरेही आहेत. ह्या जाणीवांचा आविष्कार म्हणजे काफ्काच्या (kafka) जातीची अद्भूत भीषण प्रतिभासृष्टी, तिच्यातील भीषण परस्पर विरोधी रंग व मृत्युची विविध छायारुपे आहेत या मधून आजच्या विश्वाचे भावनात्मक व नैतिक स्वरूप प्रकट होत आहे. आदर्शलक्षी उद्गारात्मक प्रवृत्ति ओसरल्यानंतर आशयगर्भ प्रतिमांचे हे तंत्र–डोस्टाव्हस्की, काफ्काच्या कादंबऱ्यात आढळते तसें–मुक्तिबोधांनी वापरले, यात शंका नाही. परंतु याप्रमाणे प्रतिमा विश्वातून अफाट नवीन क्षितिजे त्यांनी पाहिलीत तरी त्यांना कवितेत घेणे मात्र त्यांच्या आवाक्याबाहेरचेच ठरले. असा प्रयत्न त्यांनी जिथे जिथे केला तिथे तिथे राष्ट्रीय सामाजिक वृत्तीच्या पुरस्काराच्या संदर्भात हा घाट चढणे त्यांना अत्यंत अवघड गेलेले दिसते. आणि म्हणूनच काव्यात्म अनुभवाच्या एका विशिष्ट पायरीच्यावर ते चढू शकले नाहीत अशा ठिकाणी कलात्मकता साधण्यासाठी त्यांनी आधार घेतला तो आपल्या भावूक वृत्तीचा. आणि एका भावकाव्याचा आशय घेवून कवितेचा घाट नि थाट उगीचच विकारीत झाला. त्यांच्या काव्यातून एका भयानक–भेसूर नि विदारक जीवनाचे सत्य दर्शन जरूर घडते परंतु रक्त, ज्वाळा, अश्रू पीडा, घृणा इत्यादींच्या सानिध्यांत–साईड ड्रम्सच्या घन कल्लोळात एखादी 'केअर वेल टू आर्म्स्' पाहतांय की काय असा क्षणभर भास व्हावा, त्यामुळे त्यांना सांगायचे ते जीवनाविषयक सत्याचे तत्वज्ञान ज्या शब्द ब्रह्मात अवतीर्ण व्हायला पाहिजे ते बाजूला राहून एखादा 'ड्रम्स ऑफ़ डेस्टीनी' डोळ्यापुढून सरकत जातो, (हीहि जाणीव काही कमी परिणामकारक नाही) 'आऊट डोअर' वन्य प्रतिमा सृष्टी ही त्यांच्या संवेदनशील वृत्ती कॅमेऱ्याने टिपलेले अत्यंत जिवंत–बोलके असे spots किंवा क्षणचित्रे असून ती त्यांच्या काव्य प्रतिभेचाही एक अत्यंत भावोत्कट क्षण चित्रित करतात.

म्हणूनच "मुक्तिबोधांची कविता आर्तगुणी आहे. करुण आणि उदात्त रसांनी परिप्लुत आहे* असे आर्तकरुण परंतु उदात्त विधान चांगल्या अर्थाने डॉ. द. भि. कुळकर्णी करतात. बर्कच्या 'ए फिलॉसॉफिकल इन्वायरी इन टू दी ओरिजिन ऑफ अवर आयडियाज ऑफ दी सब्लाइम अँड ब्युटिफुल' या सौन्दर्यशास्त्रावरील (aesthetics) विचार प्रवर्तक प्रबंधात उदात्त (sublime) रसाचे विस्मय व भय या दोन स्थायी भावांचे त्याने पृथक् पृथक् विवेचन केलेले आहे. हे भाव मनुष्याच्या मनांत निर्माण होतात, याचे कारण त्या भावाभोवती एक प्रकारच्या गूढतेचे वलय आहे. बेनच्या म्हणण्यात हा भाव अधिक स्पष्ट आहे. " The sublime is the sympathetic sentiment of superior power in its highest degree " केशवसुतही 'उदात्त बुद्धिला संसारात राम नाही' असे म्हणून 'हरपले श्रेय शोधण्याकरिता' जीव पाखडतात. ज्या प्रीतीभावनेमुळे सौन्दर्याचा साक्षात्कार होतो त्याच सौन्दर्यभावनेच्या भावभंगात विस्मय आणि भय यांचेही रसायन घडून येते. परिणामी त्यांचे रुपांतर प्रक्षोभ रसांत होणे असंभवनीय नसते. परंतु अशा वेळी कवीच्या मूळ प्रकृतीतील संवेदनाचे आणि संज्ञांचे कमी अधिक प्रमाण–तीव्रता जाणून घ्यायला हवे. व्यक्तिगत प्रेम, नैराश्य, काळोख आणि तद्नुकूल साम्यवादी समाजवादाच्या चौकटीत बंदिस्त असलेल्या (आणि क्रांतीकारकत्वाचे श्रेय मिळविलेल्या [की हरवलेल्या] काळ महिमा म्हणून) कवी इतकीच किंबहुना अधिक प्रखर जाणिवांनी ज्वलंत अशी ही प्रेरणा आपली ओघावेगळी नवी मळवाट दाखवून देत नाही काय ? मुक्तिबोधांच्या प्रेम कवितेतील प्रेम भावना ही निसर्गसौंदर्याच्या आकलनातून जीवनानन्दाचा प्रत्यय देऊ पाहते. ते प्रेमानूभूतिचे केवळ मूर्तीकरणच नाही तर ही भावना सेन्द्रिय जीवनाच्या यात्रेतील रूपरस गंधात्मक आंदोलनातून प्रणयातील अनेक विध छटा उत्कटतेने रंगवून जाते. तिचे प्रतिमात्मक स्वरूप out–door–Imaginary असे वाटत असले तरी त्या प्रतिमाच रसिकांचे भावविश्व ढवळून टाकायला मदत करतात. रसिक मनावर झालेला हाच परिणाम साधून प्रक्षोभाची एक अभूतपूर्व

---

* डॉ. कुळकर्णी द. भि. 'मुक्तिबोधांची कविता, सत्यकथा, मे ११९७ पृष्ठ २९

मूर्ती तै दुसऱ्याच क्षणाला उभी करतात. हे मुक्तिबोधां-चेच खास वैशिष्टच (मर्ढेकरांच्या नंतर) पहा :

"माझ्यसाठी तेवतात नयनींच्या ज्योती
माझ्यासाठी गळतात मुल्यवान मोती
माझ्यावरी फुललेंल्या कितीकांच्या आशा
कुणातरी जीवा माझे अस्तित्व दिलासा --"

किवा लगेच: "माझी सर्वांवरी प्रति
माझा सर्वावरी लोभ
परी तो ना बांधु शके अशा जीवनाचा क्षोभ
जीवनाचा क्षोभ ? करी घरित्री आकांत
पाषाणाशी निर्झराती झुंज अविश्रांत"

रविन्द्र आणि रोमारोला- (जीवांची प्रचंड फेक) यांच्या भावकाव्यांत आढळते तशी ही भव्यता.

'सांज ये हळु नि गा ग ींले घुके
क्लांतशा मुखावरी हसे पुसटसे फिके
तमचढे परोपरी नि मन रडे क्षणोक्षणीं
मशिदितून ये 'अजान' काय कंपवी उरी ?

यातील अनुभूतीही अशीच उदास्त नि गुढगंभीर. "हिरवे जंगल, रानमोर, रानकव्हेर, रानकर्दळी डोंगर, हिमनग, दरी, यांच्या जोडीला येणाऱ्या-

'यौवनांचा बहार हा सुगंधित धरणीचा
वेळवूणी छायामर्मी तीक्ष्ण टाहो मयुराचा' किवा
सरसरतो पाचोळा भंगल्या देउळी
सळसळतो लाल पदर परत ना दिसे मुळी'
अथवा: 'दूर थरथरे तिथे लाल कर्दळी

इत्यादी प्रतिमा, पिंगट तिभिर, रिकामा पागोठा, वापी शहराचे दिवे दूर मागे टाकूनिया' सखिला 'बाहेर ये, निळेनिळे आले गडे अंधारुन' या सारख्या एकदम एकत्रपणे जीवन चैतन्याचा ठेवा, त्यावर चढलेला सौन्द-र्याचा साज, त्याची मानवाला असलेली ओढ अशा काहीशा प्रतिकात्मक ठरतात'* हे डॉ. चे म्हणणे खरे असले तरी त्या 'स्मृतिजन्य' असुन 'स्थिरकेन्द्री' मात्र नसलेल्या प्रेमानुभुतिच्या छटा असतात असे तेच म्हण-तात. स्थिर चित्रणासारखे त्यांचें स्वरुप वरेचदा जाणवते 'मुक्तिवोधांची कविता अनिलांच्याही पेक्षा अधिक बौद्धिक आहे आणि म्हणुन अधिक गद्यप्राय वाटते. अनिलांचा हळुवारपणा त्यांन्या कवितात नाही, आणि कवी म्हणून यश आणि मान्यताही त्यांच्या वाट्याला तादृष्य आली नाही.'* प्रा. रा. श्री जोगांचे हे विधान डॉ. द. भि. कुळर्णींच्या या भाव्यकाव्य मीमांसेच्या संदर्भात परत एकदा तपासून पाहिले तर विश्लेष वृत्तींचा वेगळेपणा या दोघांच्या दृष्टीकोनांत आढळुन येईल, इतकेच.

प्रत्येकाचा 'मी' हा आता 'आम्ही जाहलेला आहे
यातनांच्या भुईमध्ये विश्वास पेरला आहे.

परंतु कवी प्रीतीकोषाला फोडुन स्वतःकडे प्रवा-श्याची–यात्रिकाची भूमिका घेऊन आत्मशोधार्थ तो निघणार आहे, अशीही तार्कीक उपपती लावणे गैर दिसते. समाजातील अनेकापैकी मी एक आहे या भावनेने, प्रतिनिधिक वृत्तीने 'जिवाची प्रचंड फेंक, रुधिराच्या लाल सड्यातच, गंभीर झडते गगनदुंदूभि किंवा त्रिशंकुचे स्वप्न, ' अंत आहे तसा आरंभ आहे ' इत्यादी ज्या कविता लिहिल्या गेल्या त्यातील आवेश–आर्तता यांचे नाते कवीच्या कुठल्या शैलीच्या, अभि-व्यक्तीच्या, किंवा आशयाच्या तत्वावर आरंभावयाचे ? डॉ. द. भि. कुळकर्णी म्हणतात : 'मुक्तिबोधांची मराठी कवितेला देणगी आहे ती हीच : मुक्तिबोधांनी भाव-कवितेचे भावकाव्यात्म ढळु न देता तिला आशय–अभि-व्यक्ति दृष्टया विशाल केले आहे. या ठिकाणी मुक्ति-बोध एकमेव आहेत. मुक्तिवोधांच्या आधी आणि नंतर हे यश कोणाचेही नाही.'**

व्यष्टीकडुन समष्टीकडे जाणाऱ्या या कवीची दृष्टी ही अशी विकेंद्रीय आहे. जनसागराच्या प्रचंड लाटात मिसळुन जाण्याकरिता लागणारी युयुत्सु वृत्तीही आहे 'मऊ मेणाहुनि' आम्ही विष्णूदास। कठीण वज्रास। भेदू ऐसे ॥ अशी निष्टाही आहे. ज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणे: जे पुढतपुढती पार्थी। हे सकल लोकसंस्था। रक्षणीय सर्वथा। म्हणौनिया ॥ मार्गाधारे वर्तावे। विश्व हे मोहरे लावावे। अलौकिका नोहावे। लोकाप्रति आणि म्हणुन: आता कोदण्ड घेऊनि हाती। आरूढ पा इथे रथी। देइं आलिंगन वीरवृत्ति। समाधाने ॥ जगी कीर्तीते रुढवी। स्वधर्माचा मानु वाढवी। ये या भारा-

* डॉ. कुळकर्णी, द. भि 'मुक्तिवोधांची कविता' सत्यकथा मे १९६७

* जोग, रा. श्री. 'मराठी कविता' १९४० ते १९६५

** डॉ. कुळकर्णी द. भि. 'मुक्तिवोधाची कविता' सत्यकथा, मे, १९६७. पृष्ठ तेहतीस.

पासौनी सोडवी । मेदिनी हे ॥ ही वृत्ती. हे संपतीजात आधवे । हवन द्रव्य मानावे ॥

अशा प्रकारची सश्रद्ध वृत्ती असेनही मुक्तिवोधांच्या कवितेला उगीचाच एका वादाचे आवर्त घेरते आहेसे मला सतत जाणवते. ते असे की, मुक्तिवोधांची कविता मार्क्सवादातुन जन्माला आली या म्हणण्यात कितपत तथ्य आहे ? मार्क्सवादातून मुक्तिवोधांची कविता जन्माला आली असे म्हणण्यापेक्षा मार्क्सवादी विचार प्रणालीचा, ती जन्माला आल्यानंतर, अभिनिवेश तिला उगाच देण्यात आला असे मला वाटते. कारण मार्क्सवादी तत्वांची आज जी गफलत झालेली दिसते त्यामुळे आज मार्क्सवादाची काय गत झालेली आहे ते उघडच पहायला मिळते, साम्यवादी समाजवादातच मार्क्सवादाचाही अंतर्भाव होतो हे खरे असले तरी आपल्या येथील आजच्या भांबावलेल्या जनवाद्याने भांडवलशाही युगातांची अश्रद्धेने अपेक्षा करणे व्यर्थ आहे. Man is an out-come-of Circumstance ; Man is product of circrmstance ही तत्वे कुठल्याही भुमीत रुजली ? सरंजामशाहीची जखीण गारद होत असतांनाच आपल्या करंटचा पोराच्या हातात तरजू देवून ती लुप्तप्राय झाली. सत्तासंघर्षाच्या रक्ताला या करंटचाची जिभ चटकावली, ते पाहुनच फॅसीझमचा रौद्र खवळला. Dicaying capitalism + military dictatorship = "Fasism अशीज त्याची मूर्ती होती. समाजवादी साम्यवादाने त्यांच्याशी झुंज देणे शक्यच नव्हते म्हणून democratic changes च्या तत्वावर दोघांची हात मिळवणी झाली. तरीही मार्क्सवादी वृत्ती स्वस्थ बसणे कठीणच गेलेले दिसते. 'Principles of Marxism have never been developed; neither they could have been adopted nor they could totally outs the capitalist phenomenon in this world of power against humanity'* अशी जर स्थिती आहे तर मग कुठल्याही एका वादाचे वादंग मुक्तिवोधासारख्यांच्या कवितांच्या संदर्भात माजविण्यात काय तथ्य आहे ? कुठल्याही कवीच्या कवितेचे स्वरूप हे असे थोडेवहुत प्रवाहीत असतेच. परंतु कवी अशावेळी खंबीर असायला हवा.

म्हणून मुक्तिवोधांच्या कवितेला मार्क्सवादाचा कोट देणे–घेणे योग्य ठरणार नाही, किंवा त्यामुळे विचकून जायचेही प्रयोजन नाही. मोहावस्थेत सापडलेल्या अर्जुनाला सांख्ययोग, कर्मयोग, भक्तियोग इत्यादी यौगिक अवस्थांच्या पायऱ्यावरून नेत नेत अकराव्या अध्यायांत श्रीकृष्ण त्याला त्याच्याच विनंतीवरून विश्वरूप दर्शन घडवितो. ते भयानक रूप पाहून क्षणभर तर अर्जुनाची बोवडीच वळते. परंतु तो स्वत:ला सावरतो आणि परत कृष्णाला ते त्यांचे पूर्वीचे सौम्यरूप दर्शन घडविण्यास विनंती करतो. त्याच दर्शनात वैश्विक सत्याचेही दर्शन अर्जुनाला घडते. तो युद्धप्रवृत्त होतो. कोमल–कठोर भावनांचा मिश्र आविष्कार कलाकृतीला वैश्विक (universal) स्वरूप देऊ शकतो. मुक्तिवोधांच्या काव्यातही अनुभूती व आविष्कारही असाच कोमल–कठोर मिश्रीत आहे. परंतु Marxism is nothing but the acceptance of humanism in its realistic pattern & adoptation of peaceful ways and means avoiding war....' Nationalisation of land is the acceptance of communism in its socialistic pattern. असे रशियन क्रांतीच्या संदर्भात निकिता क्रुश्चेव्ह उद्‌गार का काढतो ? रशियन लेखकांच्या वैश्विक जाणीवेतून मार्क्सवादाचे पुढे आजच्या साम्यवादी समाजवादांत आणि नंतर मानवतावादांत खूप समर्थन सुरू होते. दुसऱ्या महायुद्धानंतर या मानवतावादाची सर्वच राष्ट्रांना गरज भासू लागली. भांडवलशाही राष्ट्रांत समाजसत्ता विनियोगाने जगाच्याच मालकीसाठी संघर्ष सुरू झाला. मध्यमवर्ग मधल्यामध्ये पिळून निघाला. त्रिशंकूसारखी त्याची स्थिति झाली. याच भेसूर–भयानक स्थितिगतीचे विदारक चित्र मर्ढेकरांच्या काव्यात व्यक्तिवादी विचारसरणीतून आढळते तर मुक्तिवोधांच्या काव्याला मार्क्सवादातून जन्मलेली कविता म्हणून उगीचंच एक चौकट लावण्यात येते. मार्क्सवादी विचारप्रणाली मुक्तिवोधांना पटते ती काव्यांतर्गत तिचा उपयोग करून घेण्यासाठी नव्हे तर त्यांच्या

* या संदर्भात प्रा. दि. के. वेडेकर यांनी आपल्या 'साहित्य निर्मिती आणि समिक्षा' या पुस्तकांत केलेले मार्क्सवादाचे विवेचन आणि प्रा. नरहर कुरुंदकर यांनी आपल्या 'रुपवेध' मधे कांही साहित्यशास्त्रीय प्रश्न निर्माण करुन त्यांना दिलेली उत्तरे व स्पष्टीकरण अवश्य वाचावे.

काव्यगत पिंड ब्रह्माण्डातून जे एक सर्वव्यापक जीवननिष्ठ मानवतावादी चैतन्य ओथंबून बाहेर पडते तेच खरे मार्क्सवादी किंवा साम्यवादी समाजजीवनाची धारणा दृढ करायला मदत करते. म्हणजे त्यांच्या कवितेचे व काव्यात्म जाणीवांचे स्वरुप Add-A-असे आपोआप-नकळताच वैश्विक ठरते. मग मार्क्सवादाचे किंवा कुठल्याही वादाचे आरोपन त्यांच्या काव्यावर करण्यांत काय अर्थ आहे ? मार्क्सवादाच्या कुठल्याही आवेशाच्या-आवेदनाच्या आवरणांत मुक्तिबोधांनी स्वतःला आणि आपल्या काव्याला गुरफटुन घेतल्यास त्यांच्यातला एक सच्चा कलावंत स्वतःला उगीचंच हरवून बसेल. काव्याच्या क्षेत्रांत राजकारण-समाजकारण किंवा अर्थकारण यांनी निष्कारण रण माजवू नये. आणि या कारणांची कास धरून कुठल्याही काव्याने व कवीने कासावीस होऊ नये असे (अधिकार नसतांनाही) आदराने म्हणावेसे वाटते. (क्षमा मागून असो.

या प्रमाणे ' नवी मळवाट ' वादातील स्फूर्तीदायक ठरते. मुक्तिबोधांच्याच कवितेत बोलायचे झाल्यास :

सतत प्रवासी उठेन मग मी
हाक ऐकुनी दूर कुणाची
अनावर मला ओढिल माया
दूरदूरच्या गे वस्त्यांची
जनः सागरी मिळेन तेव्हां
सापडेन ना कधी निराळा
मला बोलविल दूरदूरच्या
राजपथांचा गरम धुरोळा

प्रीती क्रांतीला जन्म देते, आणि क्रांतीत प्रीतीचे, उद्याच्या भव्य-दिव्य जीवनाचे आशादायी अंकूर वाढायचे आहेत. जनः सागरी निराळा नसूनही 'निराला' ओघावेगळा हा कवी. भावकवी का त्याला म्हणायचे ?

धनफूल .. (पान २५८ वरुन)

जातात. 'राहिले न आता मागे माझे म्हणायला'—या स्थितीनंतर 'माझ्या भावनांचा सृष्टी हा आरसा' अशी सोबत शोधली गेली की कविता उतरते. निसर्गदेखील आपला राहिला नाही अशी जाणीव व्यक्त झाली असती तर कविता अधिक परिणामकारक झाली असती. तिला एक वेगळे परिमाण लाभले असते. मनाचा एकलेपणा अधिक धारदार होऊन अनंताच्या ओढीला सखोल अर्थ प्राप्त झाला असता. म. मं. च्या कवितेला हे लाभत नाही. पण अशा अनेक गुणदोषांनी युक्त असलेली ही कविता सर्वांपेक्षा वेगळी आहे हे मात्र निर्विवाद आहे. आधुनिक कवितेच्या आजच्या कोलाहलात या कवितेचा आवाज साऱ्यांचे लक्ष वेधून घेण्याइतका निराळा उमटलेला आहे. म. मं. च्याच शब्दात त्यांच्या कवितेचे वर्णन करायचे झाल्यास ते असे करता येईल—

"भावनेचा धवधवा नसेल कुठे
पण सौम्य मृदु बहार मात्र सर्वत्र आलेली दिसते."

बालकवींची पहिली कविता

कै. वासुदेव कृष्ण भावे

[कै. वासुदेव कृष्ण भावे हे जुन्या पिढीतील एक प्रसिद्ध विद्वान होते. त्यांच्या आयुष्यातील १५ वर्षे त्यांचे वास्तव्य नागपुरात होते. सेवासदनमध्ये शिक्षक असता त्यांनी **सुमन** नावाचे मासिक चालविले. त्यापूर्वी अलिबाग व अमळनेर येथे **विकास** व **बालवसंत** ही मासिके त्यांनी चालविली होती. बालकवि ठोमरे यांचे ते बालमित्र होते.

नागपूरात एक वाङ्मय मित्र मंडळ होते. डॉ. वि. भि. कोलते, डॉ, मा. गो. देशमुख, प्रा. या. मु. पाठक, प्रा. म. श्री. पंडित, श्री. रा. पु. सगदेव, श्री. र. वि. कुळकर्णी व श्री. वा. कृ. भावे ही मंडळी त्यात होती.

श्री. भावे हे १९६६ साली निधन पावले. त्यापूर्वी त्यांनी आपले अनुभव व आठवणी लिहिण्यास प्रारंभ केला होता, पण ते काम पूर्ण होऊ शकले नाही. हे त्यांचे अनुभव व आठवणीचे हस्तलिखित नागपूर येथील शासकीय विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. र. ल. उपासनी यांच्याजवळ होते, ते त्यांनी डॉ. मा. गो. देशमुख व प्रा. म. श्री. पंडित यांना दाखवून त्यातील काही भाग तरी 'युगवाणी'त प्रसिद्ध व्हावा यासाठी वि. सा. संघाकडे दिले आहे.

कै. श्री. वा. कृ. भावे यांच्या या हस्तलिखितातील 'बालकवींची पहिली कविता' हे प्रकरण येथे प्रसिद्ध करण्यात येत आहे. प्रस्तुत हस्तलिखितातील आणखी काही भाग 'युगवाणी'त प्रकाशित करण्यात येईल.

हे हस्तलिखित 'युगवाणी'कडे दिल्याबद्दल आम्ही श्री. उपासनी यांचे ऋणी आहोत.

—संपादक]

सावकार आमच्या घरावर जप्ती आणणार आहे असे कळल्यावरून बापूंनी लक्ष्मी वहिनींना आणि मला नवापुरास ता. २ एप्रील १९०३ ला रवाना केले. त्यावेळी तात्या (बालकवीचे वडील बापूराव देवराव ठोमरे) नवापूर येथे फौजदार होते. आमचा मुक्काम नवापुरास त्यावेळी सुमारे पावणे दोन महिने झाला. त्यावेळी मी फडके मास्तरांच्या शाळेत इंग्रजी शिकत होतो.

या आमच्या मुक्कामातच बालकवींचा सर्वात धाकटा भाऊ बाबू (भास्कर) याची मुंज झाली आणि त्याची लहान बहीण कोकिळा हिचे लग्न झाले. ही दोन्ही कार्ये आमच्या मुक्कामांत अगदी शेवटी शेवटी झाली.

यावेळी अमृतराव (भाऊ) आणि त्र्यंबकराव (नाना) धुळ्यास हायस्कूलांत शिकत होते. ते सुट्टीत किंवा कोणत्या तरी कारणाने तेव्हा नवापुरासच होते. (मी बालकवींना नेहमीच त्र्यंबकराव म्हणत असे. तसेच तेहि मला वासुदेवराव म्हणत असत.) अमृतराव आमच्या पेक्षा बरेच वडील असल्यामुळे आमच्यात फारसे न मिसळता आपल्या उद्योगांत असत. बाबू तर आमच्याहून फारच लहान असल्यामुळे आपल्या संवंगड्यात खेळत राही. त्र्यंबकरावाचे आणि माझे मात्र पुरे मेतकुट जमे. आमचे स्नान, खाणे-पिणे, निजणे-बसणे, खेळणे, फिरणे कविताच्या भेंड्या, इत्यादि सर्वच व्यवहार सर्वदा एकत्र होत. वहिनी (जिजी) तर आमचे कौतुक करीतच पण गोदूताई (आई) आणि तात्या यांनाहि आमची गट्टी पाहून मोठे नवल वाटे !

कधी कधी आई आम्हांला, स्नान झाल्यावर, देवपूजा करून टाका रे, आज ! असे म्हणत. त्या दिवशी

त्र्यंबकरावांची 'देवपूजा' हे प्रकरणच सुरू होई ! ती पूजाहि दोघे मिळूनच सुरू होई ! सगळे देव संध्या पात्रांत उतरत ! माझ आठवलं तसं रूद्र म्हणणे चाले ! त्र्यंबकराव सर्व देवांना चिंच लावून रांगोळी ने घासून उजळीत ! नंतर सगळ्या देवांना स्नान घालून पुसून ठेवीत. गंध लावून फुले वाहत. त्या दिवशीं नैवेद्यालाहि काही तरी चांगले व भरपूर असे. एखादे वदिशी मारूती शिवाय बाकीच्या देवीचे स्नान झटपट आटपे आणि मारूतीला "भीमरूपी महारूद्रा" या स्तोत्राने अभिषेक होई ! मग मारूती देवांत बसत !

रोज केव्हा तरी कवितांच्या भेंड्या होतच. जिजींना वेळ असला तर त्याहि त्यांत भाग घेत ! एका बाजूला आम्ही दोघे व दुसऱ्या बाजूला एकट्या जिजी असत, तरीहि त्यांना हरवणे जडच जाई. केव्हा केव्हा आमच्या पैकी कोणीतरी आद्याक्षराच्या सोईसाठी मूळ कवितेच्या शब्दांत बदल करून किंवा ओळी खालीवर करून कविता म्हणे. जिजीचे लक्ष नसले तर ते खपून जाई. पण लक्ष असले तर मोठा वाद होई आणि आमच्यावर एक मेंडी चढे.

त्यातच आम्हाला कोणाचे तरी पाहून पुढे दिल्या-प्रमाणे अष्टाक्षरी अर्थहीन अक्षर रचना करून ती अनुष्टुम् छंदाच्या चालीवर म्हणण्याचा छंद लागला !

मा या सा र र सा या मा
या न का ल ल का न या
सा का वा न न वा का सा
र ल न क्ष क्ष न ल र

पहिल्यां आडव्या ओळींतलींच अक्षरे पहिल्या उभ्या ओळीत अक्षरे वरून खाली व शेवटच्या उभ्या ओळी, तील अक्षरे खालून वर वाचल्यास येतात ! असेच दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या ओळीचे आहे ! एवढेच या रचनेचे वैशिष्ट्य ! ओळींना कोणताहि अर्थ नाही. पण अशा अनेक रचना करीत बसण्याचा आम्हाला नादच लागला होता. आणि त्यांत आमचा किती तरी वेळ निघून जाई एवढे मात्र खरे.

रोज तिसऱ्या प्रहरी आम्ही दोघेच गावाबाहेर फिरायला जावे. कधी महालकरी-कचेरीच्या बागेतहि जाऊन बसावे. त्या कचेरीतच एका भागात तात्यांचे ऑफिस होते. प्रदेश डोंगराळ व जंगलाचा असल्यामुळे गावाबाहेर जिकडे तिकडे पांढऱ्या बोरूचे रान-पुष्कळशी लहान मोठी झाडे-झुडपे व अनेक प्रकारच्या हिरव्यागार वेली वाढलेल्या दिसत व मनाला फार आनंद वाटे. वाटेवरच्या काही वेली हिरव्या असून त्यांना बारीक बारीक गोल फळाचे असंख्य घड लागलेले दिसत. ती जांभळ्या रंगाची फळें खूपच, रसाळ होती. ती फळे हाताने दाबतांच फुटून त्यांच्या रसाने हात जांभळे होऊन जात.

एकदा त्र्यंबकरावांनी कचेरीतून थोडे कागदाचे तुकडे मागून घेतले. एका कागदाच्या तुकड्यावर त्या फळाचा थोडा रस काढला आणि कागदाला घडी घालून बोटांनी दाबून तो रस कसा तरी पसरविलाच उघडून पाहताच कागदावर विलक्षण पण अतिशय सुंदर रंगीत आकृती दिसूं लागली. हाहि प्रकार बहुधा रोजच आम्ही करू लागलो !

एक दिवस आम्ही असेच कचेरीच्या बागेत बसलो होतो ! मी सहज म्हणालो आपण या बागेचे वर्णन लिहून काढूं. त्र्यंबकरावांना तो विचार पसंत पडला आणि त्यांनी तात्यांच्या ऑफिसांतून कागद, टाक व दौत बाहेर आणली. मग ते म्हणाले, "आमच्या शाळेत एक मुलगा आहे, तो कटाव फार चांगले रचतो, तसा कटावच आपण या बागेच्या वर्णनाचा रचून पाहू !"

"कटाव" हा प्रकार काही माझ्या लक्षात येईना ! म्हणून मी म्हटले, "कटाव कसा असतो ?" यावर तें म्हणाले, "अहो, ते सुरलोकाहुनि गंगा खाली ! भूमीवर येण्यास निघाली ।" असे पद आहे ना नवनीतात ? त्या चालीवरच्या रचनेला कटाव म्हणतात ! मलाहि ते पद माहीत होते त्याच्यावर 'कटाव' असे लिहिलेलेहिं मला आठवले. आणि दोघांचे एकमत झाले. "सुरलोका" गुणगुण दोघांचीहि सुरू झाली आणि त्या गुणगुणोत समोरच्या बागेत असलेल्या व नसलेल्याहि झाडांच्या नावाची यादी गुंफली गेली !

निंब जांब जांभूळ शेंदरी ।
तुळशी बहुताचि झाक मारी ।।

"अहो, तुळशी कुठे झाक मारते ?" मी म्हणालो. त्र्यंबकराव म्हणाले, "वा: ! तुम्हाला नाही दिसत ? तुळशीच तर सर्वांत जास्त झाक मारते आहे ! तिच्या मंजऱ्या !" आणि लिहिलेल्या दोन ओळी पुन्हा वाचून आमचा कटाव पुढे सुरू झाला !

जणूं काय ती येत धावुनी ।
असेच वाटे पहा साजणी ॥
पुढे पाहिली खैरी झाडे ।
तशीच मोठी मेंदी वाढे ॥

"अहो, पण ही 'खैरी झाडे', इथे कुठे आहेत ?" मी म्हटले. "इथे नसली म्हणून काय झालं ? आपल्या कटावात ती आली ! रानांत तर ती असलीच पाहिजेत !" त्र्यंबकराव म्हणाले "हे ही पहा आता" असे म्हणून त्यांनी पुढची ओळ म्हटली.

जाइ जुई ती फार वाढली ।

आणि पुढची ओळ मी पुरी केली:—

गुंफा मोठी बहुताचि झाली ॥

इतके वर्णन झाल्यावर आमचा कटाव थांबलाच. पण ठोमऱ्यांना थोड्याच वेळांत स्फूर्ति झाली. त्यांच्या मनांत काव्य देवताच जणूं संचरली. तिन विणा झंकार केला आणि त्यांनी पुढच्या ओळी म्हटल्या !

अशा वनी मी ऐकिली मुरली ।
तिला ऐकुनी वृत्ति मुराली ॥
काय कथूं त्या सुस्वर नादा ॥
पुढे पाहिले रम्य मुकुंदा ॥
गोपांनी तो वेष्टित दिसला ।

ठोमरे थोडे थांबले. त्यावरोबर पुढे मी म्हटले:—

गळा माळांचा हार लागला ॥

पुन्हा ठोमरे म्हणून पुढे लिहूं लागले ।

पीतांबर तो कमरिं खोविला ।
गोप खेळती नाना खेळां ॥

मी म्हटले:—

किती खेळती आटया पाटया ।
किती खेळती दांडू विटया ॥

आणि त्र्यंबकरावांनी पुढच्या ओळी म्हणून कटाव पुरा केला:—

अशा करिती ते नाना लीला ।
देवहि भक्ता आधिन झाला ॥
वाटते जावे ! तत्कमलमुखा पाहावे ॥

तयार झालेला तो कटाव आम्ही पुन्हा पुन्हा वाचला. आमचा आनंद गगनांत मावेना. त्र्यंबकरावांनी ऑफिसातून आणखी दोन कागद आणले. आम्ही दोघानीहि कटवाची एक एक प्रत तयार केली आणि धावत पळत घरी येऊन "आम्ही हा कटाव केला" म्हणून तो जिजींना दाखविला !

जिजींनाहि तो कटाव वाचून खूप आनंद झाला. त्यांनी मनापासून आमचे कौतुक केले !

ही बालकवींची पहिली कविता आहे. केवळ योगायोगाने दैवतशात् मी त्या प्रसंगी तेथे होतो इतकेच ! कारण कटाव रचण्याची कल्पना त्र्यंबकरावांचीच ! आपल्या कल्पनेने त्या प्रसंगी 'मुरलीचा सुस्वर नाद' ऐकला. तोहि त्यांनीच आणि "रम्य मुकुंदा"स तेथे प्रथम पाहिले तेहि त्यांनीच ! बालकवींनी पुढच्या आपल्या अत्यल्प आयुष्यांत महाराष्ट्राला आपल्या नादमधूर, मनोहर, सरस अशा रमणीय काव्याने मोहित केले, त्याचे हे आरंभीचे प्रसाद चिन्ह होते.

पुढे बापूची मुंज आणि कोकिळाचे लग्न झाले. बेटावदच्या नारायण शंकरराव यांना कोकिळा ताई दिल्या होत्या. आमच्या बापूंना कर्ज फेडीसाठी त्यावेळी तात्यांनी काही रकम दिली ! सावकाराचे कर्ज फिटले; जप्तीचा धोका नाहीसा झाला, आणि गेल्यापासून पावणें दोन महिन्यांनी आम्ही धरणगावी परत आलो.

बालकवींच्या या पहिल्या कवितेच्या बाबतीत मला पुढे एक विलक्षण अनुभव आला ! तोहि येथेच सांगून टाकणे योग्य होईल. तो प्रसंग असा :—

मी अलिबागला असतांना, आम्ही मुलामुलींकरिता 'सुमन' नावाचे मासिक सुरू केले. माझे मित्र दत्तात्रय पांडुरंग आगाशे हे त्याचे प्रकाशक आणि मी त्याचा संपादक होतो. इ. स. १९२३ च्या जानेवारीत सुमनाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला.

संपादक म्हणून मी लेखक वि. स. खांडेकर, कवि यशवंत इत्यादि माझ्या मित्रांना सुमनासाठी कविता वगैरे पाठविण्याची विनंती केली, त्या प्रमाणे त्यांचेकडून कविता वगैरे आल्या. त्या सुमनांत यथावकाश प्रसिद्धहि केल्या.

अशा प्रसंगी मला बाल कवीचे स्मरण होणे अपरिहार्य होते. बालकवि १९१८ सालीच आमच्या घरी आले असता स्वर्गवासी झाले होते ! (ह्या प्रसंगाचे वर्णन पुढे येईलच !) त्यांची वरील 'पहिली कविता' मला पाठ होती व तिची रचनाहि माझ्या समक्षच झाली

होती. म्हणून मी सुमनच्या अगदी पहिल्याच अंकात "बालकवींची पहिली कविता" या नावाचा लेख लिहून प्रसिद्ध केला. त्यांत ती कविता, वर वर्णिलेल्या प्रसंगासह (थोडक्यात) दिली होती ! मुलांना ती कविता व प्रसंग फार आवडला. त्या वर्णनांत मी माझा उल्लेख 'दुसरा एक मुलगा' असाच सर्वत्र केला. मीच तो होतो असे कोठेहि दर्शविले नाही ! सुमनाच्या पहिल्याच अंकात हा लेख प्रसिद्ध झाला ! आणि त्यावेळी धुळ्यास एकनाथ यादव निफाडकर हे लोकमान्य मासिक काढीत असत. बालकवीचे धाकटे वंधू बाबूराव (भास्कर बापूजी ठोमरे) तेव्हा धुळ्यासच कोर्टात कारकून होते.

सुमनाचा तो अंक प्रसिद्ध झाल्यावर निफाडकरांनी बाबुराव ठोमऱ्यांच्या सहीचे एक पत्र आपल्या मासिकात प्रसिद्ध केले. त्या पत्राचा आशय पुढील प्रमाणे होता :—

"१ सुमनांत प्रसिद्ध झालेली कविता (कटाव) "बाल कवीची पहिली कविता आहे", ही गोष्ट खरी आहे.

२ ती कविता नवापुरास झाली हेहि खरे आहे.

३ पण "त्या वेळी मी तेथे होतो", असे वासुदेवरावांनी म्हटले आहे; ते खोटे आहे. ते नवापुरास मुळीच नव्हते.

माझ्या आयुष्यात, माझ्या जाणते पणी घडलेल्या प्रसंगाबद्दल, मी लिहिलेला 'मजकूर खोटा आहे' असे त्यावेळी जेमतेम सहा सात वर्षाच्या असलेल्या आणि पुढे होणाऱ्या लग्नाच्या आधी घरातील मुंजकरून टाकावी म्हणून तेव्हा ज्याला लंगोटी लावली, अशा बाबूच्या या अकारण उद्योगाला काय म्हणावे ?

मी लागलीच सुमनाचा तो अंक आणि बाबूचे पत्र छापलेला निफाडकरांच्या मासिकाचा अंक असे दोन्ही अंक बापूच्या कडे पाठविले आणि ते वहिनींना (जिजींना) दाखवून त्यांचे काय म्हणणे आहे, ते कळविण्याविषयी त्यांना लिहिले.

बापूंचे उत्तर मला तावडतोड आले. त्यातच जिजीच्या सहीची दोन पत्रे होती. त्यातले एक निफाडकराकडे पाठविण्यासाठी लिहिलेले होते. त्या पत्रांत जिजींनी लिहिले होते, "सुमनांतली हकीकत पूर्णपणे खरी आहे. मी नवापुरास गेले तेव्हा वासुदेवहि माझ्या बरोबरच तेथे होते. नाना (बालकवि) आणि वासुदेव हे दोघेही एक दिवस माझ्याकडे येऊन त्यांनी मला एका कागदावर लिहिलेली कविता दाखविली व 'ही आम्ही केली' म्हणून सांगितले; तीच कविता सुमनांत छापलेली आहे. बाबूंचे म्हणणे चुकीचे आहे." वगैरे पत्राखाली जिजींनी स्वतःची सही केली होती.

बापूनी आपल्या पत्रांत लिहिले होते.—

"जप्ती येणार असे कळले म्हणून सौभाग्यवतीस व तुम्हाला धरणगावाहून चैत्र शुद्ध ४ गुरुवारी, ता. २ तारीख १९०३ ला नवापुरास रवाना केले. भाडे १ रु. साडेसात आणे + बारा आणे = दोन रु. साडे तीन आणे. मुंजीनंतर लग्न झाल्यावर तुम्ही सौ. सह परतआला. तुम्ही दोघे सुमारे १॥। महिने राहिला" इत्यादि.

मी निफाडकरांना जिजीचे पत्र व माझे उत्तर पाठवून ते आपल्या मासिकात प्रसिद्ध करण्याविषयी विनंती केली. पण त्यांनी माझे पत्र किंवा जिजींचे पत्र प्रसिद्ध न करता आपल्या मासिकात फक्त बाबूरावांच्या पत्रावर सुमनाचे संपादक वा. कृ. भावे यांचे उत्तर आले आहे व त्यांनी आपल्या समर्थनासाठी जिजींच्या सहीचे पत्रहि पाठविले आहे. पण जिजी ह्या त्यांच्या भावजयीच आहेत. आम्हाला ते पत्र प्रसिद्ध करण्याची आवश्यकता वाटत नाही. अशा अर्थाचा मजकूर प्रसिद्ध केला ! मातृतुल्य भगिनी जिजी या माझ्या भावजयी असल्या तरी बाबूच्या भगिनी आहेत, याचा निफाडकरांना विसर पडला ! असो.

यांत निफाडकरांनी आणि बाबूने काय साधले ? त्याचा थोडा इतिहास आहे. तो असा :—

१९१८ साली बालकवींचा मृत्यु झाला, त्यानंतर काही दिवसांनी अमृतराव ठोमरे (बालकवींचे वडील बंधू) यांनी बालकवींच्या कवितांचे बाड, बालकवींचे जळगावचे एक मित्र अप्पासाहेब सोनाळकर यांच्याकडे नेऊन दिले. सोनाळकर लवकरच बालकवीचे चरित्र व कवितांचे पुस्तक छापून प्रसिद्ध करणार होते. पण काही अडचणींमुळे पाच वर्षातहि ते काम, अप्पासाहेबाकडून होऊ शकले नाही. त्यांनी ते बाड तसेच (बहुधा बाबूरावाकडे) परत केले.

सोनाळकरांनी वाड परत केले व ते हे काम करू शकत नाहीत; असे कळल्यावर, पुण्यास सेवासदनात शिकत असलेल्या पार्वतीबाई ठोमरें(बालकवीच्या पत्नी) यांच्या अनुमतीने मी हे काम अंगावर घेऊन तयारी करू लागलो ! खर्च वजा जाता उरणारा पैसा मी पार्वती बाईंनाच देणार होतो. बाबूराव ठोमरे यांना सुद्धा मी हे कळविले, पण परिणाम उलटा झाला ! त्यांनी माझ्याशी वक्रता धरली. या काळातच 'सुमनांत' ती कविता प्रथमच प्रसिद्ध झाली !

निफाडकरांनी बाबूला हाताशी धरले आणि घाई गर्दीने कसे तरी बालकवीच्या कवितांचे 'मधुगीत' हे एक पुस्तक छापून प्रसिद्ध करून टाकले !

त्या पुस्तकात वरील कविता "बालकवींची पहिली कविता" म्हणून घातली आणि ती प्रथम प्रसिद्ध करण्याचे श्रेय मात्र मला दिले आहे ! भाग्य !

त्या व्यवहारात त्या दोघांपैकी कोणाला किती लाभ झाला हे भगवंताला माहीत !

प्रसिद्ध कवयित्री लक्ष्मीबाई टिळक यांच्या स्मृति-चित्रांत बालकवीच्या आठवणीत बाबूच्या स्वभावाचे थोडे दर्शन घडविले आहे, ते अगदी यथार्थ आहे.

आमची काही प्रगती

नवापूरला तो पहिला 'कटाव' रचण्यात यशस्वी झाल्यामुळे आम्हाला अधिकच उत्साह आला. आम्ही आर्या, साकी, दिंडी, श्लोक यांच्या चालीवर नंतर रचना करू लागलो. आम्हाला मात्रा, गण किंवा वृत्तांची लक्षणे यांची तेव्हा कल्पना सुद्धा नव्हती. नवनीतातील आर्या वगैरे ठराविक चालीत गुणगुणावी आणि त्याच चालीवर, मनात आलेल्या विषयी संबंधी शब्द जुळवून ओळी तयार कराव्या. आमचे उच्चार शुद्ध व कान चांगले तयार असल्यामुळे गण-मात्राच्या दृष्टीने ओळीची रचना बहुधा निर्दोष होई. मनात विषय मात्र नेहमी जुनेच असत. उदाहरणार्थ—

हा भवसागर तरण्या, धरण्या देवासि मार्ग एक असे ।
चरणा शरण तयाच्या जावे, भावेच तोहि पावतसे ।।

—ठोमरे

विठ्ठल विठ्ठल म्हणुनी, वाजवुनी टाळे तो तुकाराम ।
गेला वैकुंठाला देहासह मिळवी पूर्ण आराम ।।

—वासुदेव

पुढे लवकरच बदली होऊन किंवा रजा घेऊन तात्या एरंडोलला आले आणि तेथेच कायमचे राहिले. अर्थात आता त्र्यंबकराव एरंडोले येथे आणि मी धरणगावी असे आम्ही बरेच जवळ जवळ आलो.

या दोन गावात अंतर फक्त सात मैलांचे असून ती पक्क्या सडकेने जोडलेली आहेत. सडकेच्या दोन्ही बाजूस ओळींनी चिंचेची झाडे असल्यामुळे भर दुपारी सुद्धा रस्त्यावर दाट सावली असते.

आता, आम्ही दर आठ पंधरा दिवसांनी एकमेकास भेटू लागलो. परस्परांची रचलेली पद्ये वाचून विचार करू लागलो. रचनेसाठी विषय निवडू लागलो. विषयांत नावीन्य मात्र नव्हते.

आमचा छापखाना (फडके प्रेस)

एरंडोलला ठोमऱ्यांच्या घराजवळच एक लहानसा शिळाप्रेस होता. त्याचे मालक माधवराव कवठेकर हे "देश काल वर्तमान" नावाचे एक वर्तमान पत्र काढीत असत. "देशकाल वर्तमान पत्र हेर सत्वर । दाखवी जना सदा सुवर्तमान चत्वरा" ।। ह्या त्या वर्तमान-पत्रावरील श्लोकाच्या ओळी लक्षात राहण्यासारख्या होत्या. त्या पत्रांत कधी एखाद्याच्या मृत्युची बातमीहि असे. "हे खरे खरे 'सुवर्तमपन' आहे." असे गंभीर चेहरा करून ठोमरे म्हणत !

त्या छापखान्यात, एका पिवळट कागदावर हाताने मजकूर लिहून त्या कागदावरून एका पांढऱ्या दगडावर उलटा उमटवीत; नंतर त्यावर शाईचा रूळ फिरवून यंत्राने पुष्कळशा कागदावर तो सुलटा छापला जाई !

तो छापखाना पाहून आमचा छोटासा छापखाना सुरू केला !

बाजारातून जांभळा रंग आणून त्याची चांगली घट्ट तयार केली. त्या शाईने एका पांढऱ्या कागदावर थोडा मजकूर, व दोन ओळीची एक ठोमऱ्यांची कविता त्यांनी लिहिली. हे लिहिण्याचे काम बहुधा ठोमरेच करीत, कारण त्यांचे अक्षर फारच सुंदर होते. एक बारीक कपडा पाण्यात भिजवून त्याची पुष्कळ पदरी साफ घडी करून ती एका पाटावर ठेवली. त्या घडीवर मजकूर लिहिलेला कागद पालथा पसरून तो स्लेट

(पान २८३ वर)

एक बातमी –

शंभर वर्षांपूर्वीचा पुनर्विवाह

प्रा. ब्रह्मानंद देशपांडे

या वर्षी दिवाळीच्या सुटीत संशोधनानिमित्त हिंडत असता अकोला जिल्हयातील वाशिम तालुक्यातील मोठेगाव नामक खेडयात जाण्याचा योग आला. येथील श्री. नारायणराव जाधव यांचेकडे दोन ताम्रपट लखुजी जाधवरावांच्या वेळेचे मिळाले. त्यातील एक मिरास-पत्र असून दुसरे तकसीमनामा म्हणजे वाटणीपत्र आहे. जाधवांचे हे घराणे प्राचीन असून त्यांच्याकडे ऐतिहासिक कागदपत्रांचेही मोठे दप्तर आहे. ते दप्तर चाळीत असता ठाणे जिल्हयातील 'अरुणोदय' नामक जुन्या वर्तमान पत्राचा अंक हाती लागला. हा अंक रविवार ता. २० जून १८६९ चा असून पुस्तक ४ अंक २५ असे शिरोभागी छापले आहे. सुमारे शंभर वर्षांपूर्वीच्या या अंकाचे स्वरूप आजच्या वाचकांना मनोरंजक वाटेल असेच आहे. विशेषतः नवीन वकिलीची सनद घेणारांची नावेहो छापून येत असत हे पाहून आज निश्चितच आश्चर्य वाटेल. उदाहरण म्हणून काही बातम्यांचे सार खाली देत आहे.

१. चिचणी ता. ११ जून १८६९. या गांवी म्यूनिसीपालिटी झाली आहे असे समजले तर मग रस्ते पाहणेच नको. जिकडे तिकडे केर हेदर आहेच....एवढयाशा मुनिसिपालिटीत २ कारकून मग शहराचे ठिकाणी किती असावे याचे त्रैराशिक करावे म्हणजे समजेल— पत्रकर्ते महाराज एक जुनी म्हण आहे शेट सव्वाशेर आणि लिंग अडीच शेर ही म्हण अगदी या मु. लागू आहे,

२. ठाणे. चालत्या जून महिन्याची ता. १६ पर्यंत ठाणे शहरात १६६ मनुष्यांस वारण्याचा उपद्रव होऊन पैकी ९३ मेली. या सोळा दिवसात सरासरीच्या मानाने रोज पावणे साहा मनुष्यांहुन जास्त मरतात असे होते.

३. मौजे फुलगांव तालुके हवेली येथे राहणार सदू विन खेता मारवाडी उमर वर्षे अदमासे १२ हा पायाळू असल्यामुळे येथील राजवाडयात द्रव्य आहे या हेतूने गेले बुधवारी हृचा पायाळू मुलास.... डोळयास अंजन घालून राजवाडयात नेले तेथे काही न सांपडल्यामुळे या मुलावरच संक्रांत बसविली हे पुढे त्या मुलाचे प्रेत सांपडल्याने कळले, केवढे हे धारिष्ठ.

हृया वर्तमान पत्रातील बातम्यांचे स्वरूप कसे होते याची कल्पना यावी म्हणून येवढे लिहिले. आता यातील पुर्नविवाहाची हकीकत आजच्या वाचकांस मनोरंजक वाटणारी व कुतूहल उत्पन्न करणारी आहे म्हणून ती येथे उद्धृत करीत आहे.

"पुर्नविवाह लागला

धर्मशास्त्रात आठ प्रकारचे विवाह सांगितले आहेत त्यांची नावे—

१. ब्रह्म विवाह	२. देवविवाह
३. आर्षविवाह	४. प्रजापति विवाह
५. असूर विवाह	६. गंधर्व विवाह
७. राक्षस विवाह	८. पिशाच्च विवाह.

हृयातून सातवा व आठवा कलीत वर्ज आहेत. साहवा गांधर्व विवाह स्त्री-पुरुषांचे अनुमोदनानेच फक्त होतो. हल्ली जो विवाह लोकात प्रचलित आहे त्यास ब्रह्मविवाह असे म्हणतात. या विवाह प्रकरणाचा समग्र विचार केला असता स्त्रियांचा पुर्नविवाह करण्यास अडचण दिसत नाही. पुष्कळ दिवसांमागे ब्राह्मण लोकांत विधवाविवाह प्रचारांत होता तो अलिकडे शंकराचार्य स्वामींनी कित्येक नेम ब्राह्मण लोकांचे वर्तनाविषयी ठरविले त्यात हा झाला असा आधार मिळत आहे. त्या आधारावरून आज फार दिवस या बाबतीत वाटाघाट चालून शेवटी काल रोजी रावबहादुर मोरोबा कान्होबा यांनी नवीन बंगला घेतला त्यात लग्न समारंभ झाला. नवऱ्याचे नांव पांडूरंगपंत याने त्या जमलेल्या सर्व मंडळीत असे नांव घेतले की ही माझी बायको हिचे नांव रुक्मिणी असे घेऊन नंतर नवरीने आपल्या नवऱ्याचे नांव घेतले. "रुप्याचे ताट त्यात घातले बत्तासे

